१९७४ * १९७५

२१ ● अंक ३०

# अजिंठा

ळजी जेठा कॉलेज

जळगाव

नियतकालिक




संपादक -
प्रा. शं. र. पुणतांबेकर.
र्थी प्रतिनिधी -
दत्ता कोल्हे.




स्त्रीच्या नजरेचा केंद्र बिंदू, जें सुंदर पुरुष ग्वालियर सूटिंग-शर्टिंग परिधान करतात.

आता सीज बहार करणाऱ्यांची संगत करेल ग्वालियर !

GWALIOR SUITING

जळगांव जिल्ह्यातील ग्वालियर मिलचे एक रिटेल शॉप राधिका श्री नटवर टॉकीज जवळ, जळगांव

जळगांव जिल्हयांतील ग्वालियर मिलचे एक रिटेल शॉप

# रा धि का

श्री नटवर टॉकीज जवळ, जळगांव


# अंगण

## मुळजी जेठा महाविद्यालय जळगाव

## नियतकालिक

१९७४-७५

वर्ष- २९ * अंक ३०

मुखपृष्ठ सजावट- दत्ता कोल्हे ( विद्यार्थी प्रतिनिधी )
( तृतीय वर्ष 'कला' विभाग )

## ‘ अजिंठा ’ संपादक मंडळ

### १९७४ – ७५

प्राचार्य — चं. रा. पोतनीस

उपप्राचार्य — मु. म. थत्ते

डॉ. — शं. र. पुणतांबेकर ( प्रमुख संपादक )

प्रा. — म. मो. केळकर

प्रा. — जे. व्ही. महाजन

प्रा. — रा. वा. पाटील

प्रा. — पी. एन्. हुपरीकर

प्रा. — आर्. डी. चौधरी

प्रा. — इफ्तिकार अहमद

श्री. — दत्ता कोल्हे ( विद्यार्थी प्रतिनिधी )
( मंत्री– अ. भा. विद्यार्थी परिषद, जळगांव )


: प्रकाशक :
डॉ. शं. र. पुणतांबेकर
मु. जे. महाविद्यालय
जळगांव ( महाराष्ट्र )

: मुद्रक :
सुभाष व्ही. नेहेते
डेक्कन प्रिंटींग प्रेस
नवी पेठ, जळगांव ( महाराष्ट्र )


# संपादकीय–

गेल्या वर्षाप्रमाणे याही वर्षी ( १९७४–७५ ) एकच अंक सादर करीत आहोत. कागद आणि छपाई यांची महगंता यामुळे इच्छा असूनही पानांची संख्या मर्यादित ठेवावी लागली आहे.

१९७४–७५ हे वर्ष अनेक दृष्टींनी संस्मरणीय ठरलेले आहे. विद्यार्थी चळवळी, बिहार आंदोलन या सारख्या अन्तर्गत घडामोडींनी साऱ्या विचारवन्तांचे लक्ष वेधले आहे. तसेच जागतिक रंगभूमीवर भारताचे स्थान आणि महत्त्वही वाढलेले आहे. भारताने आपला पहिला अणुस्फोट करून अणुशक्तिसंपन्न राष्ट्रांच्या मालिकेत जसे आदराचे, कौतुकाचे स्थान मिळविले आहे. तसेच अणुयुगात अभिनन्दनीय पाऊल टाकले आहे. दुर्बलाची अहिंसा नेहमीच उपेक्षेचा व हेटाळणीचा विषय होते. पण समर्थांच्या अहिंसेमुळे एक प्रकारे नैतिकतेचे तेजोवलय निर्माण होते. अणुयुगात प्रवेश करताना भारतानेही “ अणुशक्ती शांततेसाठी ” या सूत्राचा उद्‌घोष करून आपल्या शांतताप्रियतेच्या धोरणाला जागतिक वातावरणात अधिकच वजन प्राप्त करून दिले आहे. प्रत्येक भारतीयाला या घटनेचा आणि धोरणाचा आनंद आणि अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही. आणि “ पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावि काल ” या विनायकांच्या उक्तीप्रमाणे “ समर्थ आहे माझा भारत ! ” असाच प्रत्येक भारतीय जयजयकार करील !

## जिमखाना आणि इतर मंडळे–

नेहमीप्रमाणे आपले महाविद्यालय १५ जूनला सुरू झाले. पहिल्या स्टाफ मीटिंगमध्ये प्राचार्यांनी विविध कामाची वाटणी प्राध्यापक वर्गात करून दिल्यानंतर अध्यापन व विविध कार्यक्रमांना प्रारंभ झाला. सर्व मंडळांचे अहवाल शेवटी दिलेले आहेत. त्यावरून वर्षभरात झालेल्या विविध कार्यक्रमांचे स्वरूप व महत्त्व दिसून येईल. प्रा. अभ्यंकर, श्री. देशमुख यांच्या प्रेरक मार्गदर्शनामुळे जिमखाना विभाग अत्यंत कार्यक्षम राहून त्यामुळेच विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा–स्पर्धेत अभिनंदनीय व नेत्रदीपक यश संपादन केल्याचे दिसुन येईल. त्याचप्रमाणे इतर मंडळेही विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास होण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्नशील राहिली आहेत असे त्यांच्या अहवालावरून दिसून येईल.

## स्नेहसंमेलन–

दुसऱ्या सत्रात स्नेहसंमेलन उत्साहपूर्ण रीतीने पार पडले. वर्ग–प्रतिनिधींच्या निवडणुका होऊन जनरल सेक्रेटरी म्हणून श्री. तानाजी भोईटे यांची निवड झाली. तसेच प्रा. डी. एस्. नेमाडे यांची स्नेहसंमेलनाचे कार्याध्यक्ष म्हणून निवड झाली. प्रा. नेमाडे यांच्या समंजस व स्नेहशील स्वभावाने स्नेहसंमेलन अत्यंत चांगल्या रीत्या पार पडले. अल्पोपहार, विविध क्रीडा–स्पर्धा व करमणुकीचे कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात व शांततेत झाले.

स्नेहसंमेलनाच्या पहिल्या दिवशी "इकबाल – दरबार" यांचा संगीत वाद्य – गायनाचा – करमणुकीचा कार्यक्रम सादर करण्यात आला. नव्या – जुन्या चित्रपटातील श्रवणीय गाणी त्यांनी सादर करून विद्यार्थ्यांचे भरपूर मनोरंजन केले.

दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांचे विविध करमणुकीचे कार्यक्रम सादर करण्यात आले. नाटिका, गीते, नृत्य, नभोवाणी आदि कार्यक्रमांनी विद्यार्थ्यांचे भरपूर मनोरंजन झाले. शेवटी "शेला पागोटे" हा कार्यक्रम तर एकंदर कार्यक्रमाचा कळसच म्हणावा लागेल.

## वसतिगृह–

प्रा. रा. वा. पाटील, प्रा. आर्. जी. खारूल यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांचे वसतिगृह उत्तम प्रकारे सांभाळले जात आहे. अभ्यास वर्ग, उद्‌बोधक व्याख्याने, स्नेहसंमेलन आदि कार्यक्रमामुळे वसतिगृहांतील वातावरण सर्वदा अभ्यास–पोषक, उत्साहवर्धक, गुणसंवर्धक राहिले आहे.

## ग्रंथालय–

प्रा. पुणतांबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालय व वाचनालय उत्तम प्रकारे मागील परंपरा सांभाळीत सुयोग्य वाटचाल करीत आहे. आपल्या ग्रंथालयात सर्व विषयांचे मिळून जवळ जवळ ४७ हजार ग्रंथ आहेत. वाचनालयाची नवी इमारतही पूर्णतेच्या मार्गावर आहे. या इमारतीने महाविद्यालयाच्या परिसरात एका भव्य वास्तूची भर पडणार आहे. वर्षानुवर्ष आपल्या ग्रंथालयात उत्तमोत्तम ग्रंथांची भर पडत असते विविध योजनांनुसार विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ग्रंथांची मदत दिली जाते. श्री. व्ही. एस्. चौधरी व त्यांचा सहाय्यक सेवक वर्ग आपापली जबाबदारी चांगल्या रीतीने पार पाडीत असतो. आपले सुसज्ज, समृद्ध ग्रंथालय ही एक अभिमानास्पद



गोष्ट आहे असे निःशंकपणे म्हणावेसे वाटते. ग्रामीण परिसरातील फारच थोड्या महाविद्यालयात असे ग्रंथालय आढळून येते असे आपल्या ग्रंथालयास भेट देणाऱ्या बाहेरील महाभागांनी उद्‌गार काढलेले आहेत.

## स्टाफ वृत्त–

या वर्षी पुढील प्राध्यापक–प्राध्यापिका आपल्या महाविद्यालयात नव्याने आलेले आहेत.

१) प्रा. साळवे–– इतिहास
२) प्रा. कु. व्हेगस–– इंग्रजी
३) प्रा. सौ. प्रमिला भिरूड–– मराठी ( अर्ध वेळ )

१५ जून १९७४ पासून आपल्या महाविद्यालयातील मराठीचे नामवंत प्राध्यापक व मराठीतील ख्यातनाम समीक्षक प्रा. म. ना. अदवन्त हे निवृत्त झाले. त्यांनी आपल्या मनमिळाऊ स्वभावाने व अध्यापनकौशल्याने मराठी विभागाची एक आदर्श व स्पृहणीय अशी परंपरा निर्माण केलेली आहे. त्यांचा अध्यापनव्यवसायातील प्रदीर्घ अनुभव, संशोधक वृत्ती आदि गुणांची योग्य ती दखल घेतली जाऊन विद्यापीठ अनुदान मंडळाने तीन वर्षासाठी त्यांची विद्यापीठ अनुदान मंडळ योजनान्तर्गत प्राध्यापक म्हणून आपल्याच महाविद्यालयात नियुक्ती केलेली आहे. ही गोष्ट त्यांना जशी अभिमानास्पद आहे त्यांच्या अभिमानास्पद आहे तशीच आपल्या महाविद्यालयाला अभिमानास्पद आहे. त्यांच्या अध्यापनाचा व मार्गदर्शनाचा हा लाभ आपल्याच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना घडणार आहे. हा जसा त्यांचा एक उच्च सन्मान आहे तसाच तो आपल्या महाविद्यालयाचाही आहे. या अपूर्व सन्मानाबद्दल आम्ही महाविद्यालयाच्या वतीने प्रा. म. ना. अदवन्त यांचे हार्दिक अभिनंदन करतो व उत्तरोत्तर त्यांना असेच सन्मान लाभोत अशी शुभेच्छा व्यक्त करतो. प्रा. म. ना. अदवन्त मराठी विभाग प्रमुख म्हणून निवृत्त झाल्यानंतर प्रा ज. वि. महाजन यांची मराठी विभाग प्रमुख म्हणून नियुक्ती झाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभाग आपली संपन्न परंपरा पुढील काळातही सुयोग्य प्रकारे चालवील असा आम्हास विश्वास वाटतो

या वर्षी आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापकांचे पुढीलप्रमाणे ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत––

१) प्रा. शं. र. पुणतांबेकर–– शिशेके टुकडे ( नाटक )
२) उपप्राचार्य मु. मु. थत्ते–– 1) A Course in Analytical Chemistry ( For S. Y. B. Sc. )
2) Theoretical Inorganic Chemistry ( For S. Y. B. Sc. )
३) प्रा. राजा महाजन–– सूर्यांनी लेक आणि गुन्हेगार ( कथासंग्रह )

आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक अध्यापन कार्याबरोबरच संशोधन, ग्रंथलेखन आदि गुणसंवर्धक व समाजोपयोगी कार्यातही मनःपूर्वक भाग घेऊन प्रयत्नशील असतात.

वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा. डॉ. पी. आय. चौधरी यांना विद्यापीठ अनुदान मंडळातर्फे रु. तीन हजारची संशोधन शिष्यवृत्ती मिळाली आहे. त्यांच्या कपाशी विषयक संशोधनाचा शेतकऱ्यांही लाभ होणार आहे. आम्ही त्याना या संशोधन कार्यात सुयश चिंतितो. तसेच बॉटनी विभगातील श्री. पी. व्ही. वाणी हे देखील आपले पी. एच्. डी. चे कार्य करीत आहेत. तसेच श्री. इ. एम्. वाठ ( प्राणिशास्त्र विभाग ) यांनीही आपले पी. एच्. डी. चे कार्य पूर्ण केलेले आहे.

या वर्षी जळगाव नगरपरिषदेच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकीत आपल्या महाविद्यालयातील प्रा. श्यामकान्त कुळकर्णी हे बळीराम पेठेतून नगरसेवक म्हणून नगरपरिषदेवर चांगल्या प्रकारे यश मिळवून निवडून आले याबद्दल त्यांचे खास हार्दिक अभिनंदन ! नगर परिषदेच्या विविध समित्यांवरही त्यांची निवड झालेली आहे. त्यांनी नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभातून, आपल्या विधायक, अभ्यासु वृत्तीची छाप पाडली असून त्यांच्या कार्याने नगर परिषदेला बराच लाभ होणार आहे तसाच त्यांच्या या सामाजिक कार्यांचा आपल्या महाविद्यालयालाही लाभ घडणार आहे. प्राध्यापक संघटनेतही ते शहर संघटनेचे सेक्रेटरी आहेत. तसेच प्रा. तल्हार हे शहर संघटनेचे जॉइन्ट सेक्रेटरी आहेत. प्राध्यापक संघटनेने आता चांगलाच जोर धरला आहे. विधायक नेतृत्व, सांघिक वृत्ती, सहकार्य यामुळे ही संघटना दिवसेंदिवस भरीव कार्य करील असा विश्वास वाटतो. डॉ. सु. रा. चिरमाडे आता जिल्हा प्राध्यापक संघटनेचे अध्यक्ष म्हणून धुरा सांभाळीत आहेत. तर प्रा. डी. व्ही. पाटील हे 'पुक्टो' चे जॉइन्ट सेक्रेटरी म्हणून सन्माननीय पद भूषवीत आहेत.

आपल्या महाविद्यालयातील एन्. सी. सी. शाखाही शिस्त, स्फूर्तिप्रद मार्गदर्शन या दृष्टीने सतत कार्यरत असते.

या वर्षीची उल्लेखनीय गोष्ट म्हणजे श्री. जे. वी खडके यांची संपूर्ण अमरावती विभागातूव एकमेव "मेजर" म्हणून सन्माननीय निवड झालेली आहे व त्यांना "मेजर म्हणून हुद्दा देण्यात आला आहे. या त्यांच्या बहुमानाबद्दल त्यांचे खास अभिनंदन ! प्रा. डी. एच्. महाजन यांच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचेही कार्य सुयोग्य रीतीने वाटचाल करीत आहे

वाजिठा



६

या वर्षी आपल्या महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने "स्व. दादासाहेब भिकमचन्द जैन आंतरमहाविद्यालयीन हिंदी वादविवाद स्पर्धा" प्रथमच आयोजित करण्यात आली. या स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व आजचे एक सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. सुरेशचंद्र जैन यानी आपल्या स्व. पित्यांचे स्मरणार्थ दिलेल्या देणगीतून व्यक्तिगत पारितोषिके व चांदीचा कप अशी पारितोषिके ठेवण्यात आली. अशा रीतीने एका चांगल्या व आदर्श उपक्रमात श्री. सुरेशचंद्र जैन यांनी देणगी दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच हिंदी विभागाच्या वतीने पुढील वर्षी 'घनश्याम ज्वालाप्रसाद अग्रवाल हिंदी एकांकी स्पर्धा' आणि 'जगन्नाथ गणेशराम अग्रवाल हिंदी निबंध स्पर्धा' यांचेही आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी संबंधितांनी देणगी देण्याचे आश्वासन दिलेले आहे.

## सन्माननीयांच्या भेटी–

या वर्षी मंडळांच्या विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने पुढील महनीय व्यक्तींनी महाविद्यालयास भेटी दिल्या--

१) विद्यावाचस्पती विष्णूजी क्षीरसागर ( नाशिक )
२) प्रवचन केसरी भालचंद्र शास्त्री मुळे ( नाशिक )
३) संसद सदस्य श्रीनिवास सरदेसाई ( दिल्ली )
४) श्री. राजा मंगळवेढेकर ( पुणे )
५) ॲड. टी. एस्. हेगडे ( मुम्बई )
६) न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी ( नागपूर )
७) श्री. गोविंदराव देशपांडे ( मुम्बई )
८) कवी अनिल ( नागपूर )
९) श्री. विनीत कुबेर ( सातारा )

## गुणवत्ता संवर्धन योजना–

या वर्षी कॉमर्स विभागाच्या प्री. डिग्री; ए फ्. वाय्. बी. कॉम् च्या विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता संवर्धन योजना आखण्यात आली. विद्यार्थ्यांकडून एक प्रश्नपत्रिका भरून घेण्यात आली. ज्या विद्यार्थ्यांना विशिष्ट विषयांत विशेष मार्गदर्शन हवे अशांना या योजनेत सहभागी करून घेण्यात आले. बहुसंख्य विद्यार्थ्यांनी या योजनेत अल्प फी भरून भाग घेतला. या योजनेत प्रा. अभ्यंकर, प्रा. राणे, प्रा. डी. व्ही. पाटील, प्रा. हुपरीकर, प्रा. तल्हार यांनी विद्यार्थ्यांना आठवड्यातून वेळापत्रकाप्रमाणे येऊन विशेष मार्गदर्शन केले. या योजनेचा विद्यार्थ्यांना निश्चितपणे फायदा झाल्याचे दिसून आले. या योजनेत मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापक बंधूंचेही विशेष अभिनंदन ! असा उपक्रम सर्वच शाखेतील विद्यार्थ्यांसाठीं हाती घेण्यात यावेत असे आम्हास सुचवावेसे वाटते.

## आभार–

ह्या अंकाच्या संपादन कार्यात सर्वच संपादक मंडळाचे सहकार्य व प्राचार्य फोननीस व उपप्राचार्य थत्ते यांचे सुयोग्य मार्गदर्शन आम्हास लाभले आहे. याबद्दल आम्ही त्यांचे कृतज्ञ आहोत. विद्यार्थी वर्गाचे सहकार्यही चांगले लाभले आहे.

अंकाच्या छपाईचे काम डेक्कन प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. सुभाष नेहेते यांनी चांगले करून दिले आहे. त्याबद्दल त्यांचे आभार. तसेच जाहिरातदारांचेही आभारी आहोत. या वर्षीचे निर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधी श्री. दत्ता कोल्हे ( तृतीय वर्ष 'कला' विभाग ) यांनी मासिकासाठी कमाल निधी जाहिरातीच्या रूपाने मिळवून दिला. तसेच त्यांनी मुखपृष्ठाची सौन्दर्याकृती उत्कृष्ट रीतीने तयार केल्याबद्दल व या मासिकाच्या कामामध्ये त्यांनी पुष्कळच मदत केली म्हणून त्यांचेही आभार, तसेच ब्लॉक्सचे काम मनोहर प्रोसेस, जळगाव यांनी सुबक रीतीने करून दिल्याबद्दल त्यांचे आभार. पुनश्च एकदा सर्वांचे आभार.

श्री. दत्ता कोल्हे
( तृतीय वर्ष 'कला' विभाग )
विद्यार्थी प्रतिनिधी

डॉ. शं. र. पुणतांबेकर
प्रमुख संपादक





अजिंठा संपादक मंडळ १९६४—६५

## सायन्स असोसिएशन मॅनेजींग कमेटी १९७४—७५



### जळगांव विभागीय निरनिराळ्या संघात निवड झालेले खेळाडू



वार्षिक स्नेह - सम्मेलन मॅनेजिंग कमेटी १९७४—१९७५



## जिमखाना मॅनेजींग कमेटी १९७४—७५



जळगाव विभाग — आंतर महाविद्यालयीन
मुलींचा खो खो विजयी संघ



# अंगण

## मराठी विभाग

ललित वाङ्मय जीवनावर प्रेम करायला शिकवतं. जगातलं कुठलंही चांगलं ललित साहित्य हे हिंसात्मक कधीही नसतं ! जीवनावर प्रेम करायच्या आड जेव्हा आसुरी शक्ती येतात, त्यावेळी गायलेली संतापाची आणि निराशेची गाणी ही माणुसकीने ओथंबलेल्या जीवनावरच्या प्रेमातून उद्‌भवलेली असतात. एका निराळ्या सुरात आणि निराळ्या भाषेत लिहिणारे लेखक केवळ निराळ्या भाषेत लिहितात म्हणून जीवनाचे शत्रू ठरत नाहीत. ते भक्तही असू शकतात

— पु. ल. देशपांडे

( अध्यक्षीय भाषण- मराठी साहित्य संमेलन, इचलकरंजी )

# 'क्षितीजाकडे....
# नजरेपल्याड !'

एक पंख आभाळाचा
एक पंख धरतीचा
घेतोय भरारी जीवनविहग
क्षितीजाकडे
नजरेपल्याड– !

एक भरारी सुखाची
एक उभारी दुःखाची
नेतेय वाट आशेची
क्षितीजाकडे
नजरेपल्याड– !

एक क्षण जीवनाचा
एक क्षण मरणाचा
चाललाय खेळ आयुष्याचा
क्षितीजाकडे
नजरेपल्याड– !

– सौ. प्रमिला मिरुड

# वळण

कु. वंदना गगडाणी
Jr. M. A.

तू कदम भेकड माणूस आहेस नाम्या. आला दिवस तुला वाकुल्या दाखवून जातोय अन् तू बसलाहेस ढीम्म्. मला माहित आहे. हल्ली जगणं यालाच म्हणतात. पण तुझ्या हे कसं अंगवळणी पडलं रे? तू असा नव्हतास. क्षणाक्षणाला तुझे डोळे बदलायचे. कधी अगदीच मवाळ दिसायचे– बावळटासारखे! तर कधी लुकलुक चमकायचे लगेच निखाऱ्या सारखे. धगधगायलाही लागायचे. कधी पाण्याने ओलेचिंब व्हायचे अन् कोरडे ठणठणीत पडायचे दुष्काळातल्या जमिनीसारखे ! म्हणूनच आपण दोस्त झालोत. मन जुळल्याविना मी कुणाला दोस्त म्हणायचा नाही ! तुझ्याबरोबर ते जुळलं नाहीच तर पार मिसळून गेलं. पण आताशा ते उसळी मारून वर यायला लागलय्. आपला वेगळा चेहरा दाखवतं आहे. हे असं का होतय् ? तू – तू सुध्दा तुटत चाललाहेस की काय माझ्यापासून ? तसं असेल तर हे जरा जडच जाणार आहे. कारण मला तुझ्यासारख वळणाबरोबर वळण घेत जाणं जमणारं नाहीच. माझा रस्ता मी ठरवतो. देवाप्रमाणे गुपचूप बसणं आपल्या आवाक्याबाहेरचं आहे. माझे हात शिवशिवतात आणि जिभहि वळवळते !

नाम्या, मला काहीच विसरता येत नाही अन् तू तर साऱ्याच आठवणी खाल्लेल्या घस्तूसारख्या गडप करतोहेस. अरे, दारु मी प्यायलोय, तू नाही ! झालय तरी काय् ? खर सांग, आपलं ते पूर्वीच खदखदून हसणं, ढसढसा रडणं ऐकू येत नाही तुला ? आपण मारलेल्या कडकडून मिठ्यांचे वळ अजून माझ्या मनावर आहेत. त्यांना जपलच आहे मुळी मी ! माझ्या गळयातून उतरलेल गाणं ऐकायला कसा कासावीस व्हायचास तू ! आज मला भेटणं टाळतोहेस. नशेत थोडे पाय वाकडे पडले तरी मन घट्ट आहे माझं.

आपली पहिली भेट माझ्या गळ्याने आणि तुझ्या कवितेने घालून दिली होती. त्यांचं नातं आपण जवळ येण्याआधीच पक्क झालं होत. मला तुझे शब्द वेड लावायचे. तुला माझा गळा धुंद करायचा. गावातले लोक आपले कोण कौतुक करायचेत. आपले एकमेकात गुंतलेले हात आपण अजूनच दाबायचो. त्यावेळेला आतून कुठून ३

तरी हसायचा आवाज यायचा ! हे तर तूही मान्य केलं होतं. तू म्हणालाही होतास, 'शांत्या, मी मेलो तर तुझा डफ माझ्या प्रेतावर ठेवायला विसरू नकोस. तुझ्याबरोबर मी माझी लेखणी पाठवीन.' आत्ता मला विश्वास नाही वाटत तुझ्या या म्हणण्याचा. मनातल्या साऱ्या आठवणींनी हैराण करून सोडलय मला. त्यांनी तर सुखवायला हवं, पडताना आधार द्यायला हवा !

वाटतं, फिरून ते दिवस यावेत. नको हे स्वातंत्र्य ! इथं ना आपलं आपल्यावर राज्य ना परक्यांचा सासुरवास. धड हसताही येत नाही आणि संतापून किंचाळताही येत नाही ! नाहीतर पूर्वी, ब्रिटीशांचा तो झेंडा वाऱ्याबरोबर मिरवताना पाहून पायाच्या नखापासून डोक्याच्या केसापर्यंत निव्वळ त्वेष भरायचा शरीरात. गांधीजी, बोस, नेहरू, गुरूजी या नावांचं वेड लागलं होत आपल्याला. रस्ता मोकळा असताना सरळ पळता येत असूनही पाय कसे जडजड वाटायचे. आपल्याला कुणी बांधून ठेवलय ही जाणीव काही म्हणता काही सुचू द्यायची नाही ! मग कोऱ्या कागदावर तुझी शाई आकार घ्यायची. माझ्या गळ्यात मन उतरायच. केवढ मंडळ जमवलं होतं आपण. ह्या दोघं सामर्थ्यामुळे ! डफावर माझा हात आदळायचा आणि तुझे शब्द संतापाने लालीलाल झालेले असायचे. त्यांनी थोडा समजूतीचा सूर घेतला की माझा आवाज हळू व्हायचा.

मग लपत–छपत काढलेले दिवस ! काय काय सोंगं चढवायचो आपणं ! मागचा ससेमिरा चुकवल्यावर 'हुश्श' करून पुन्हा कामाला लागायचो ! भोळ्या चेहेऱ्यांच्या प्रेमाने भारून जायचो. आपल्याच माणसाच्या हातातला परदेशी दंडुका पाहून त्याच्या नरडीचा घोट घ्यायला चवताळलेल्या सिंहासारखे गुरकायचो ! पण अशाच एकाने तुला पिंजऱ्यात टाकलं. तू कैदेत गेलास. मला कविता मात्र पाठवायला चुकला नाहीस. माझ्या गळ्यानेही आपलं इमान विकलं नाही. त्या दिवसांत तर वाटायच आपणहून सापडून जाव पोलीसांच्या हातात. जावं तुझ्याजवळ. पण तुझ्या कवितेसाठी तरी माझे सूर मोकळ्या हवेतच रहायला हवे होते. त्यासाठी मी जीवापाड जपत होतो.

कैदेतून सुटून आल्यावर गावात तुझं आम्ही केलेलं. भव्य स्वागत ! मी तुझ्या कपाळाला गुलाल लावण्यासाठी पुढे झालो आणि तू मला मिठीत घेऊन सारा गुलालच सांडून टाकला. मग आपल्या कपाळावरचा थोडी काढून तू माझ्या कपाळाला रंगवलं होतस्. त्यादिवशी रात्रभर तू मला गाणी म्हणायला लावली होतीस. तेव्हा प्रत्येक दिवसाचा वेगळा रंग होता. त्यात रंगून जायला आपण आपल्या रात्रींचंही अर्थ वेत





होतो. पुरेपूर झपाटलो होतो. तेवढ्या गडबडीतही तू माझ्या गळ्याला जपायचा. म्हणायचास. "गधड्या, देवानं दिलेल्या एवढ्याश्या सामर्थ्यालाही कमी लेखू नये. त्याला डोक्यावर घेऊन मिरवाव ! त्याला पायदळी तुडवणं म्हणजे आपण किडा–मुंगी होणं !" माझ्या नावापुढे 'शाहीर' किती कौतुकाने लिहायचास् तू ! अशावेळी तुझे शब्द तुझे टपोरे डोळे व्हायचेत. मला गिळून घ्यायचेत.

तेच तुझे शब्द आता किती छोटे दिसायला लागले आहेत– म्हणून तूही ! मला हे सहन होत नाहीय्. ते मला गिळून तर टाकत नाहीतच पण त्यांच्यात शिरूही देत नाहीत. अगदी लांबून आल्यासारखे दाणकन् समोर येऊन आदळताहेत. खोट्या नाण्यासारखे हास्यास्पद ठरताहेत ! तरीही तू त्यांना 'आपलं' मानतोहेस. मला निव्वळ शब्दांवर प्रेम करणं जमतच नाही. त्यांचे अर्थ मला प्राणापलीकडे प्यार आहेत. जसं केकाटणं वेगळं आणि सूरात गाणं वेगळं ! काळ बदलत असतो हे मलाही मंजूर आहे. आपणच बघना, कधी डोक्यावर शेंडी मिरवली तर वाढलेल्या केसांवर दिमाखात खादीची टोपी चढवली ! .... अन् एकेदिवशी ती मी फेकून दिली. कारण ती आपला पांढरा रंगच गमावून बसली होती !

डोक्यावरची गांधी टोपी मी संतापून डबक्यात फेकून दिल्यावर तू एक सणसणीत चपराक माझ्या गालावर ठेवून दिली होती. आपला पहिला खटका उडाला होता तेव्हा. तू रागात घोगऱ्या आवाजात म्हणाला होतास, "तुला एवढही कळत नाही शांत्या ? वस्तू बदलत नाही, तिला घालणारा बदलतो !" मी थंडपणे उत्तरलो होतो, "नाम्या, वस्तूला एकदा अर्थ दिल्यावर तो बदलवायचा माणसाला कोणाचाही अधिकार नाही ! आणि हे त्याने केलंच् तर वस्तूला अर्थच उरत नाही. मग त्या अर्थाने ती वस्तू वापरणं मला पाप वाटतं !" यावर तू नाक उडवलं होतस् ! .... रात्रभर मी झोपलो नव्हतो. तू दूर गेल्याची जाणीव मात्र मला तितक्या तीव्रतेने झाली नाही. इतक्या सहजतेने जोडली गेलेली मनं तुटणं मला अशक्य वाटलं ! आजही वाटतय् ! पण ह्या वाटण्याबद्दलही मला हल्ली गोंधळायला होतय्.,.. तेव्हा तुझ्या घोरपडीसारख्या चिवट निष्ठेचा मला मनापासून अभिमान वाटला होता.

आपल्यात पहिला फरक झाला ! तुझ्या काळ्याभोर केसांवर पांढरी टोपी अन् माझे वाऱ्याने उडत जाणारे केस ! ह्या फरकाकडे दुर्लक्ष करायची सवय मी मनाला लावून घेतली. तुझ्याबाबतीत खरोखरच माझं मन फार मऊ आहे. तुझ्या प्रत्येक वागण्यातून ते इतका चांगला अर्थ काढतं की मलाच नंतर शरमल्यासारखं

होवून जातं. दोन-तीन दिवस झालेत मी रोज तुझ्याकडे येत होतो. तुला न भेटता मला परतावं लागायच. पहिल्यांदा वाटलं तुला खरच खूप कामं असतात. आज मा उगीच एक शंका आली ‘तू मला चुकवत तर नाहीस ?’’

नाम्या, आयुष्यात मी तीन वस्तूवरच जीव टाकला. एक तू, माझा डफ आणि फार उशीरा भेटलेली दारू ! माझी दारू सोडण्याचा तू काही कमी प्रयत्न केला नाहीस. पण मी म्हटलेल्या पोवाड्याची पोरांनी भर सभेत केलेली ‘हूर्यो’ विसरण्या-साठी दुसरे काय होतं माझ्याजवळ ? आता मी संतापून काही बोललोच तर ते बरळ ठरतं ! मी फार केविलवाणा झालोय् रे ? मनातली तळमळ बाहेर पडण्यासाठी जवळ शद्बही नाहीत. माझ्या रक्तात मिसळलेल्या शद्बांचं मोलच मी सांगू शकत नाही. परवा रात्री दारू प्यालेलो होतो मी. गावात आलेला वग पहायला गेलो त्या नशेतच. मी काय पाहिलं माहित आहे ?.... स्टेजवर उघडाबंब पडलेलो मी आणि माझ्यावर थयथय नाचणारे ते वगवाले. त्यांच्या लावणीतली प्रत्येक ओळ चाबकाचे फटके मारत होती. सुकलेलं माझं शरीर अधिकच काळं–निळं पडत होतं. खूप संयम पाळला. पण नाही राहवलं गेलं ! जगण्याच्या जिद्दीने सारे प्राण गळ्यात आणून किंचाळलो.... मला रात्री कुणीतरी घरी टाकून गेलं होतं. आजूबाजू कुणी ओळखीचं असलं तर मी घरी येतो. नाहीतर माझी सकाळ रस्त्यावरच होते !

नाम्या, तू ते पूर्वीचेच शद्ब आण, त्यांच्यात मनापासून अर्थ भर. मी तुझा शांत्या – बघ काय कमाल करून दाखवतो ते ! शद्बाविना गळा पोरका झालाय् नाम्या माझा ! मला भिती वाटते रे, इतकं मन लावून जगलेलं आयुष्य मी घालवून तर नाही बसणार ? माझ्या तोंडाला येणारा दारूचा वास गिळून टाकणारे शद्ब घडव. मला शुद्धीवर यायचय् रे !

° ° °

बापरे ! एखाद्याचं जळणारं प्रेतही इतकं बोलू शकतं ? उडगारी प्रत्येक ठिणगी इतकी आग लावून जाते ! मी तर अक्षरशः पळून आलो तियून. त्याचा ‘प्रिय मित्र’ असलो तरी शोकसभेत बोलायच मी नाकारलं. हे इतकं ऐकू येत असूनही नाही म्हटलं मी ! सरळ कानावर हात ठेवले. खरच मी भेकड आहे. त्याची भिती खरी ठरली हे सांगायचं बळ माझ्यात नाही. शांत्यासाठी असलेले माझ्या जवळचे शद्ब कधीच संपले. त्यांच्याबरोबर पूर्वीचा नाम्याही गेला. शांत्या शेवटपर्यंत मला विनवत होता, लिहि म्हणून. पण बदललेल्या काळाचे अर्थ त्याला पेलताच आले नसते. डोक्यावरच्या साध्या टोपीचं त्याला ओझं ! घर असलेल्या, संसार असलेल्या माणसाला



किती ओझी वहावी लागतात, काही वेळेस आपलंही ! त्या दिडशहाण्याने ते वहाण्या-ऐवजी दारु पचवली ! वेळेनुसार मंदिर बदलावं, त्याने त्या निकामी डफाची मूर्खा-सारखी पूजा केली. आयुष्यभर वस्तू अन् अर्थाची सांगड घालता घालता स्वतःचा सांगाडा केला. त्यांच्या मिळवणीत सारी वजाबाकी पदरात पाडून घेतली !

आता जगात काय माझ्या एकट्याचेच शद्ब होते ? इतका दमदार गळा होता. लोकं माना माना डोलावतील अशा शद्बांचं वारेमाप पिक आजूबाजू होतं. भलताच हट्टी होता शांत्या ! स्वतःला गहाण ठेवूनही मित्रासाठी करताना पाय मागे नाही करायचा. एखाद्या गोष्टीवरचं उडालेलं त्याचं मन त्याला उभं जाळून टाकलं तरी पुन्हा बसायचं नाही. निव्वळ काळ नाही, वेड्या आपल्यालाही फार बदलाव लागतं. प्रत्येक काळाच्या निष्ठेचं, आवडीचं गाठोडं बरोबर असलच् पाहिजे. नसेल तर मिळवायला हवं ! माझी निष्ठा कसली आलीय् चिवट ? मी मन पार लवचिक करून घेतलय् शांत्या टोपी घालायच जेव्हा तू नाकारलस तेव्हाच मी समजलो की तुला नवीन हवा काही मानवली नाही ! तू तसा मरणारा नाही पण असा मरशील ! गुदमरून....

....तुला हवा असलेला पूर्वीचा काळ मी ठेवणीतल्या कपड्यासारखा जपला आहे. एकटा असलो की त्याला बाहेर काढतो. त्यांच्या सुगंधाने सुखावतो. पण त्यांच्या मोहात मी पडत नाही. त्यातला मीसुद्धा मला अनोळखी वाटतो. त्या ‘मी’ ची मान काय ताठ असते. डोळ्यातही पाणी असतं ! अन् आताचा ‘मी’ पेन्शनच्या रांगेत चालच्या मानेने उभा असलेला ! कशाचा कशाशी मेळ नाही. मी म्हणजे तुझ्या नाम्याचं भूत आहे शांत्या ! .... सगळ्या लोकांमध्ये आपण वेगळ दिसाव असं मला वाटतही नाही. माझ्या रक्ताच्या मुलांसाठी तरी मला तसं वाटून चालायचं नाही ! तू मला स्वार्थी म्हणशील ! म्हण ! तुझ्या मुलांची स्थिती पाहून तूच ठरव स्वार्थीची व्याख्या. मेलेल्या निष्ठांच्या सापळ्यांना बिलगून त्यांना पोरकं करायचा अधिकार तुला रे कुणी दिला होता ?

तू गेलास तरी मी रडत नाहीय्. माझ्या दृष्टीतून तू फार पूर्वीच संपला होतास. नेहमीच तू माझ्याकडे यायचास. पुढे पुढे तर दारू पिऊनही यायला लागलास. एकदा गटारीतून उठून आल्यासारखा चिखलाने भरलेला, पिंजारलेल्या केसांना खाजवत दारात उभा राहिलास. तुझ्याऐवजी शेजाऱ्यांनी माझ्याकडे विचित्र नजरेनें पाहिलं. आपल्या मैत्रीचा इतिहास ऐकण्याइतका त्यांच्याजवळ वेळ तरी कुठं आहे ? .... त्या नंतर मात्र मी घरी असूनही मुलाला बाहेर पाठवून ‘ घरात नसल्याचा ’ निरोप तुला

सांगितला. माझ्या दारातून तुला पुन्हा रस्त्यावर पाठवलं ! हे करतांना वाईट वा पण शरमल्यागत झालं नाही. कारण मनाला फसवून बर–वाईट काहीही करत नाही त्याला साक्षी ठेवतो अन् मग पाऊल उचलतो. म्हणूनच मी कुठेही अडखळत नाही!

.... आत्ता स्मशानात तुझं प्रेत जळून राख होत होतं. बाजूला तुझी पो दीनवाण्या चेहेऱ्याने रडत होती. आणि काही अतंरावर तू गेलास म्हणून सुरू होती शोकसभा ! खोटं पाहून लालबुंद होणारे तुझे डोळे आणि गर्जणारा आवाज आठवला. अक्षरश ; वाटलं उधळून टाकावी ती सभा .....पण मी तोंड लपवत घरी आलो.... शेवटी तू काय करू शकलास ? तू गेलास, तुझ्याबरोबर तुझी निष्ठा गेली ! उरलीत फक्त मुठभर हाडं अन् चिमुटभर राख ...... तुझ्या प्रेताला खरंतर जाळायचीही गरज नव्हती. बाजूला सुरू असलेल्या शोकसभेबरोबर तू हळूहळू जळायला लागलो असतास ..... मला तर खात्री आहे त्या शोकसभेची जर तुला कल्पना असती तर... तर तू वेड्या मेलाच नसतास !

# हार्दीक शुभेच्छा :-

( १ ) विजय बुक डेपो, जळगांव
( २ ) विजय विद्यार्थी वाचनालय, जळगांव



# लेटेस्ट ! लेटे .... स्ट !!

*श्री. सुभाष सी. बोरसे*

**T. Y. B. A.**

शिंपी म्हटला की देखल्या देवा दंडवत ! अगदी थेट कोपऱ्यापासून, तोही दुरूनच ! त्याच्या सावलीचा आपल्या सावलीला स्पर्श न होता. आहेच तसा हा शिंपी माणूस. उगीच नाही मी म्हणत. आजचंच घ्या ना ! 'लेटेस्ट टेलर' ही पाटी मोठ्या दिमाखाने बसली होती. त्या दुकानाच्या पायऱ्या मी चढलो, आणि त्याबरोबर माझा पाराही चढला. 'आज एक महिना झाला चकरा मारतो आहे ( केवळ समोरच्या मंडईतून चकरीची भाजी नेण्याकडेच त्याचा उपयोग ) पण तुमच्याकडून साधी अंडरपॅंट शिवून दिली जात नाही. अहो, नोकरीसाठीदेखील साहेबांच्या पायऱ्या एवढ्या झिजवल्या जात नाहीत, फक्कडशा बायकोच्या शोधातसुध्दा एवढ्या चकरा मारल्या नाहीत, हो, आणि मारल्या असत्या तर आजच्यापेक्षाही सौंदर्याने सवाई बायको मिळाली असती ( Yet I am a bacholar )...... झिरोपासून ४२० पर्यंत वाढत चाललेला माझा पारा खाली उतरावा म्हणून त्या शिंपी महाशयांनी डॉक्टरप्रमाणे मला एक गोळी दिली. कडू नव्हे, गोड – लिमलेटसारखी ! 'बसा की, आत्ता शिवून देतो अर्ध्या मिनिटात'– हीच ती ! मी एकवेळ मंत्र्याच्या किंवा पुढाऱ्यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवीन पण शिंप्याच्या, मुळीच नाही ! कारण अर्धा मिनिट काय पण अर्धा दिवस बसलो तरी ती ( अंडरपॅंट ) मिळाली नाही. बाकी तेवढ्या वेळात मला शिंपी गृहस्थाची सुतराम ओळख झाली मात्र. नाही तरी मी आज युगानुयुगे या जातीला जातीने ओळखत आहे म्हणा. ( यात तिळमात्र शंका नाही. माझ्या वयाकडे बघून ) मग कधी सांगितल्याप्रमाणे वेळेवर कपडे शिवून देईल तो शिंपीच कसला ? ( अपवाद वगळून हं ) आणि 'लेटेस्ट टेलर' या आपल्या अन्वर्थक नावाला उगीचच गालबोट लावील कशाला ? पाटीवर लेटेस्ट (अत्याधुनिक) आणि कृतीतही लेटे....स्ट ( उशीरातउशीरा ) ! !

तोंडावर हास्याचे चांदणे पसरवून हा गिऱ्हाईकाचे स्वागत करीत असतो. पण एकदा का गिऱ्हाईकाकडून कपडे मिळाले की थापा मारूनच हा त्याची बोळवण

करीत असतो. थापा मारणे ही एक कला आहे, असं म्हणतात. ती या माणसाला चांगलीच साधलेली दिसते. याच्या साऱ्या थापात एक प्रकारची सफाई आहे, आणि या थापांच्या कातरीने साऱ्याच गिऱ्हाईकांना तो सफा करीत असतो. गोऱ्यापान कातरीने तो कापडाचा गळा साफ करीत असेल, पण त्याबरोबर गिऱ्हाईकाचाही हे सारे बसल्या बसल्या खुर्चीवरुन नि सावलीतच ! शिंपी एक राजा आहे तो या अर्थानेच. वेळेवर त्याला दुभत्या गाईच्या लाथा गोड वाटतात. पण त्या सावळ्या मुरलीधराप्रमाणे तो खोऱ्याने ( ज्यावरचे आकडे दिसत नाही अशा टेपने ) गाईचे दुध ओढत असतो. त्याला फक्त 'घघाची' विद्या येते 'ददाची' विद्या तितकीशी येत नाही तसेच ' पैं प्रदक्षिणा लक्ष दक्षिणा ' ( ' पैं दक्षिणा लक्ष प्रदक्षिणा ' – ह्या म्हणीतील शद्बांची जागा बदलून ) तोच करीत असतो. थापांच्या गुंगीमध्ये पैं प्रदक्षिणा करून लक्ष दक्षिणा घेण्याची जादू त्यालाच माहित ! सण आला की ढेकणाप्रमाणे याचे रक्त मणभर वाढतेच नि भावही वाढतोच, मग तो शिंपी साधा असो की लेटेस्ट ! !

शिप्याच्या जीवनाचे भांडे अशा अनेक कलांनी ओतप्रोत भरलेले आहे. थापा मारणे, कापड मारणे, शिलाई मारणे, खोटे बोलणे, या जंत्रीचा बगीचा लंबा चवडा आहे. त्यातील कलांची संत्री खाता खाता वाचकांना ढेकर येईल. बापूजींनी एके ठिकाणी म्हटले आहे.– ' जीवन जगण्याची कला सर्वांत श्रेष्ठ आहे ! ' पण मी तर असे म्हणेन की, जीवन जगावयाचे असेल तर खोटे बोलण्याची कला श्रेष्ठ ! ती आत्मसात केलीच पाहिजे ( तीही शिप्यानेच ) ती आत्मसात करण्यासाठी शिवण कलेच्या क्लासेसमध्ये नाव नोंदविण्याची जरूरी नाही. जीवन जगतांनाच शिप्याच्या मनाच्या पड्यावर ती आपोआप नोंदली जाते. शिप्याला खोटे बोलण्याची कला अवगत नसती तर तो शेणाचे दिवेच लावत बसला असता.

रोज मरे, त्याला कोण रडे, म्हणतात ना ? तशातली गत. नेहमी तीच बोलणी. ( आज देतो, उद्या या, संध्याकाळी आणून देतो, फक्त बटन लावयाचे आहेत. इ. इ. ) डाव्या कानाने ऐकावी न् उजव्या कानाने सोडून द्यावी. आणि पुन्हा शिप्याची पायरी चढावी. कारण शिंपी हा मानवजातीच्या जीवनातील एक अविभाज्य घटक आहे. शिंपी आहे म्हणून तुम्ही आम्ही परस्परांना भेटतो. बोलतो. चालतो, व्यवहार करतो. शिंपी नसता तर– बाप रे ! ( Just imagine )

शिंपी हा एक गरीब माणूस आहे स्वभावाने मात्र ! तो एक सालस प्राणी



आहे. जीवन जगण्यात हं ! तो अहोरात्र झटणारा माणूस आहे. सावलीत बसून मात्र हं ! तो थापा मारणारा असेल पण निरुपद्रवी आहे. तो खोटे बोलणारा असेल पण मेहनत करणारा आहे. तो आळशी असेल, पण वेळ आली तर रात्रभर जागून काम करणारा आहे. राबेल तो चाबेल, हाच त्याच्याजवळ हिशेब ! तेव्हाच तो जगतो ! जीवन जगण्यासाठी माणसाला दोन गोष्टीची जरुरी असते. अन्न आणि वस्त्र. अन्नाची तहान शेतकरी भागवतो. वस्त्राची भूक शिंपी भागवतो. केवढी विधात्याची मर्जी ! म्हणून अवधुत मानवजातीला कपडड्यांच्या कृपाछत्रा – खाली आणणारा शिंपीच माननीय ! असा हा अवधुत मानव जातीला, दिगंबर जनार्दनाला, प्रमाणात आंगडे टोपडे घालणारा उपकार कर्ता नसता तर –

' शिप्याला वगळा हतप्रभ झणी , होतील मारी तने.

हेच सत्य ! ! आज घरातून, दारातून गल्लीबोळातून, हमरस्त्यातून शिप्याचे तांडे बसलेले आहेत. पण खरा शिंपी आज बाजूला पडला आहे. हिसकावून घेतली आहे त्याची कला. तुम्ही, आम्ही, साऱ्यांनीच. शिवणकला ही एक महानकला आहे. महानमंत्र आहे. गायत्री मंत्रासम. शिवणकलेची गोड मैना शेवटी ज्याच्या पिंजऱ्यातून उडाली आहे तोच कलावंत ( पण आमच्या समाजात एक परंपरा आहे ना ? नामदेव महाराजांनी पोळी पळवून नेणाऱ्या कुत्र्याच्या मागे तुपाची वाटी नेली. तेच आज खरे कलावान शिंपी करीत आहेत)

# आयुष्याचे क्षण ....

कु. सुनंदा चौधरी
F. Y. B. A.

आयुष्यातले सारे क्षण–
वेचायचे नसतात
काही क्षण विखुरलेले
काही क्षण हरवलेले
काही मात्र जपायचे असतात.

आयुष्यातील सारी सुखे–
आठवयाची नसतात
काही मिळालेली असतात
काही मृगजळ ठरतात
काही सुखे मानायची असतात.

आयुष्यातली सारी दुःखे–
पचवायची नसतात
काही सहायची: असतात
काही विसरायची असतात.

आयुष्यातील सारी स्वप्ने–
फुलत नसतात
काही वेड लावून जातात
काही नुसतीच तरळून जातात
काही मात्र आयुष्यच बनतात !

* * *



# मधुचंद्र

श्री. दत्ता कोल्हे
T. Y. B. A.

रडक्या सुरांत भोंग्याचा आवाज होऊं लागला. रस्त्यावरच्या लोकांची आडोशाच्या जागी पळापळ झाली. मोटारी, गाड्या रस्त्याच्या बाजूला उभ्या राहिल्या. एस. आर. पी. चे लोक दंडाचा पट्टा सावरीत, खटखट बूट वाजवीत लोकांना इशारा देत होते. समोर वीस–पंचवीस पावलांच्या अंतरावर चौरीचौरा स्टेशन दिसत असताना सुद्धा सरोजला जेथल्या तेथे थांबणे भाग पडले. सरोजने आसपास नजर टाकली, आणि चटकन् अेक कल्पना तिच्या डोक्यात आली. काहीशा उल्हासाने ती हसली आणि चटकन् डावीकडच्या अेका भव्य इमारतीतल्या अेका ब्लॉकच्या दारावरची घंटा वाजविली. केस विसकटलेले आहेत, कपाळावर आठ्या पडलेल्या आहेत, पॅन्ट चुरगळली आहे, आणि शर्ट घामाने मळकटला आहे अशा अवतारात सुधेशने दार उघडले, आणि दोघेही परस्पराकडे पाहून क्षणभर स्तिमित झाली.

वाऱ्याच्या जोराने दरवाजा फटकन् बंद झाला आणि सुधेशने उगीचच इकडे–तिकडे पाहिले. कपाळावरचा आलेला घाम पुसला. मित्राच्या तरुण पत्नीबरोबर आपण एकांतात बोलत आहो या जाणिवेने त्याला किंचित चमत्कारिक वाटले. पण मग त्यानं धीटपणाचा आव आणला. सुधेश, काय वेड लागलयं की काय तुम्हाला ? नि अहो लग्न करून एक महिना झाला नाही, तोंच ही संन्यस्त दीक्षा घेतलीत ? स्वतःचे हे हाल चालविलेत ? कशासाठी ?

सुधेश आ वासून सरोजकडे पाहात होता. ' व्याख्यानाला निघालात की काय, वहिनी ?' ' कुठे ? हो, हो, आता पाच वाजता ढेबेवाडीतल्या भगिनी मंडळात व्याख्यानच आहे माझं ! तिथेच निघाले होते मी ! तो मध्येच ही ' अेअर रेड वॉर्निंग ' झाली भलताच खोळंबा होणार होता माझा ! बाकी सुधेश, किती आभार मानू तुमचे ! बरी राहिला म्हणून तुमच्या घराचा आसरा घेता आला मला ! अेवढा वेळ कुठंतरी ताटकळत राहावं लागलं असतं ना ? आता की नाही ! तुम्हाला छानसा चहा करून देते हं मी ! ' असं म्हणून सरोज आत सरकलीसुद्धा. या वेळी कुणी भलताच माणूस येऊ नये अशी मनातल्या मनात प्रार्थना करीत सुधेश सरोजच्या त्या पाणीदार

चटपटीत मूर्तीकडे आणि चहा करताना होणाऱ्या हालचालीकडे नुसता पहात राहिला.

" बाकी सुधेश, विजयाचा नि तुमचा प्रेमविवाह झाला ही गोष्ट खरी तरी वाटेल का कोणाला ? अिश्श, बाकीच्या मंडळीचं अेक जाऊ दे, पण ही कशी गेली तुम्हाला टाकून ? हेंच का प्रेम तुमचं ? लग्न होऊन अेक महिन्यातच तुमच्यावर डालड्याचं तुप लावलेल्या खानावळीतल्या कच्च्या पोळचा नि आळी शिजविलेला भात खाण्याचा प्रसंग यावा ! दुर्दैव तुमचं, दुसरं काय ! पतीच्या सुखाची नि आरोग्याची काळजी अशीच का घेणार आहे विजया ? मिष्कीलपणे सरोज बोलत होती. पण इकडे सुधेशच्या काळजाला काही तरी टोचल्यासारखं होत होतं. गुळगुळीत चेहरा करून त्याने चहाची कपबशी हाती घेतली. " नाही तरी बायकांना दोष किती द्यावा, हा प्रश्नच आहे ! पण म्हणा ! तुम्ही पुरुषच अितके भेकड दुबळे बनल्यावर त्यांनी काय करायचं ! हं ! पण अेकदम गप्पसे बसला आहा मघापासून रागावलात सुधेश ? " हा पहा ' सर्व व्यवस्थित ' ( ऑल क्लियर ) धोका गेल्याचा मोठ्या सुरांतला भोगा वाजू लागला. मला आता गेलंच पाहिजे. बरं का, रविवारी आमच्या येथेच या जेवायला हं ! मजेत गेला बाई वेळ ! नाही तर वळचणीला सक्त उभ राहण्याची आपतिच आली होती माझ्यावर ! अच्छा नमस्ते. "

विजयाचा नि सुधेशचा विवाह होऊन पुरता अेक महिनाही झाला नव्हता. तोच युद्धाची वावटळ त्यांच्या भागात आली. लग्न होताच लागलीच मधुचंद्राकरिता दोघांनी महाबळेश्वरी जायचे असे मनातल्या मनात सुधेशने सतरांदा ठरवले होते. पण घरच्या वडील मंडळीपुढे तसे स्पष्ट बोलण्याचा धीर नव्हता. नंतर ' माहेरी जाण्याची तू टूम काढ आणि मग परस्पर आपण तिकडून महाबळेश्वराला जाऊ ' अशी विजयाजवळ त्याने भुणभुण लावली. पण तसं खोटेपणाने वागण्याचा तिला धीर नव्हता. मधुचंद्र शेवटी दहा बाय दहा फुटाच्या पार्टिशन मारून केलेल्या खोलीत सुधेशचा साजरा झाला. साजरा झाला कसला ? रसिक सुधेशचे समाधान मुळीच झाले नव्हते. सबंद मोकळेपणी प्रणयाचे रंग खेळायला, हसायाखिदळायला त्या दोघांना मुळीच सवड सापडली नव्हत्ती. बेचैन अवस्थेत, तळमळत सुधेशने चारपाच दिवस कसेबसे काढले. सहाव्या दिवशी विजयाचे प्रेमपत्र सुखरूप प्रवास करुन त्याच्याघरी आले आणि ती पहिली प्रणयपत्रिका वाचून त्याचा जीव बराचसा भांड्यात पडला. सरोज वहिनीने बोलावले असूनही रविवारी त्यांच्या घरी गेला नाही. आणखी पाचसहा दिवसांनी प्रेमपत्र नंबर दोन, कालच त्याच्या हाती पडले होते आणि ते किती गोड ! विजया इतके सुंदर लिहिते याची त्याला कल्पना नव्हती. प्रेमकाव्याने थबथबलेली तिची दोनही पत्रे काल अठरा वेळा त्याने वाचली होती. त्या गुंगीतच तो झोपी गेला होता.



दुसऱ्या दिवशी ' मोनालिसा ' बंगल्याच्या फाटकात शिरला आणि त्याला पहिली सलामी मिळाली. " इश्श. भाऊजी. गेल्या रविवारी आम्ही किती वाट पाहिली तुमची ! आला नाहीत ना ? आज आला काय ? आम्हाला वाटल, विजया आली नि तुम्ही महाबळेश्वर गाठलं बहुतेक ! मधुचंद्राकरिता महाबळेश्वरला जाणार होता म्हणे तुम्ही ! " " मग तुम्हाला काय वाटलं ? जाणार नाही आम्ही असं ! विजयाला चार ओळी खरडायची खोटी, आलीच पाहिजे ती धावत ! "

" हॅं, हॅं. तोंड बघा येणारणीचं ! गेलीच असती मग कशाला ? तोंडावरची माशी उडेना नि म्हणे धावत येईल. इतका कसला मेला गरीब स्वभाव. अति सौजन्य हा सुद्धा अेक मूर्खपणा ठरतो, भाऊजी ! आपण, पैजलावू या चला. तुम्ही आमच्या खर्चानं महाबळेश्वरी जायचं. नाही आली तर तुमच्या खर्चाने आम्ही जायचं ! कबूल ?" ' हो, हो, ' कबूल ! सुधेश अिरेस पडून बोलला. सर्वांनी चहा घेतला नि सुधेश घराकडे परतला

तो घरी परत आला तेव्हा, दारापुढे गॅलरीत बॅग आणि बेडिंग पडलेले होते. ते कोणाचे ? याचे आश्चर्य तो करतोय तोच शेजारच्या ब्लॉकमधून प्रत्यक्ष विजया त्याच्या पुढे येऊन उभी राहिली " विजया तू आलीस ! किती छान झालं. माझी लाडकी – " सुधेशने तिला ह्यदयाशी कवटाळलं. " सरोजवहिनीवर रागावू नकोस हं ! खोटं पत्र लिहिलं म्हणून. माझ्या सुखासाठी केलं त्यांनी तसं. किती प्रेमळ आहेत त्या ? " " अिश्श, रागावेन कशी ? किती आभार मानू त्यांचे असं झालंय. अिकडे असं अेकट वनवासी नि लढाईच्या धोक्यात ठेवून मला का सुख होणार तिथं ? मला वाटलं तुम्हीच खोटं पत्र लिहून बोलावून घ्यावे मला ! पण तुम्ही कसले सांबाचे अवतार ! सरोज – वहिनींनच ओळखलं अंतकरण ! "

दुसरे दिवशी सुधेश आपली सुटकेस भरीत होता आणि विजया पातळाच्या घड्या करीत होती, तोंच सरोजवहिनीचा नोकर अेक पत्र घेऊन आला. सुधेशने ते झटकन फोडले.

प्रिय भाऊजी,

विजया काल आली समजले. कशी का होईना, पैंज जिंकलीत. आज महाबळेश्वराला जायला निघालच ! तिकडील खर्चाचे बिल इकडे पाठवावे

( आकडा सत्तर ऐशीच्या वर जाता कामा नये ) तुमच्या लग्नात आहेर दिला नाही ना आम्ही ? सर्वांनी त्याच त्याच वस्तू द्यायच्या, त्यापेक्षा आपण काहीतरी निराळं करावं असं मला वाटलं. राकेशला मी सांगितलं होतं, त्यांच्या मधुचंद्राचा खर्च आपण करू म्हणून ! जन्मभर आमची आठवण राहील. महाबळेश्वराच्या रानात हातात हात घालून फिरताना सरोज वहिनींची आठवण एकदा तरी काढाल ना ?

तुमची
सरोजवहिनी

सुधेशचा कंठ सद्गदित झाला. विजयाचे डोळे पाणावले. 'वहिनी, किती प्रेमळ तू !' अस्पष्ट उद्गार निघाला आणि नंतर सुधेशच्या प्रेमाश्रूंचे आणि विजयाच्या आनंदाश्रूंचे मीलन झाले, हे सांगणे न लगे.


-: जळगांवातील :-

प्रख्यात कापड दुकान --

# रामदास आणि कंपनी

भवानी मंदीराजवळ

आमचेकडे सर्व पेठांची पातळे, लग्न मौंजीस लागणारे सर्व प्रकारचे रेशमी कापड, शालु, खण, आणि रेशमी न जरीची पातळे मिळतील

– किफायतशीर भाव –


'आजिंठा'







**Sau. Shashi Wani**
B. Sc. ( Botony )
Ist Class with Distinction



**P. T. Chaudhari**
B. Sc.
Ist Class with Distinction



**J. M. Agrawal**
F. Y. B. Sc. ( B )
Ist Class 1974



**J. K. Gurav**
B. Sc.
Ist Class with Distinction



**A. P. Chaudhari**
Ist Class the University Exam.
Pre-Degree Examination
Oct. 1974 - 75

स्व. दादासाहेब [illegible]चन्द जैन, हिन्दी वक्तृत्व स्पर्धा विजेते



श्री. वसन्त बोरोले



श्री. अमर विसराणी



कु. विनोदिनी कुळकर्णी



← Shri A. S. Borse
F. Y. B. Sc. (A)
Ist in M. J. College
1974 – 75

# लोकसाहित्य


*वामनराव एन्. पाटील*
**Sr, M. A.**


लोकसाहित्याच्या गंगोत्रीचा प्रवाह अनंत काळापासून अखंडपणे वाहात येत आहे. या गंगोत्रीला कथा, दंतकथा, उखाणे, पाळणे, ओव्या अशा सख्या येऊन मिळतात आणि तिचा प्रवाह अथांग करण्यास मदत करतात. या गंगोत्रींचा काळ शोधून काढणे अवघड असले तरी तिचा उगम मात्र मानवी प्रतिभावंत संवेदनशील मनोभावनेतूनच झाला हे सत्य आहे. 'गाण्याने श्रम वाटतात हलके' या पद्यपंक्तीचा आधार घेतला असता लोकसाहित्याची निर्मिती श्रमजीवी जनांनीच केली असे म्हणण्यात अतिशयोक्तीचा दोष निर्माण होण्याचे कारण नाही. 'गाण्याने' या शब्दावरून असेही म्हणता येईल की, लोकसाहित्याची निर्मिती आधी काव्यरूपानेच झाली असावी.

लोकगीतांशी मानवी जीवनाचा अन्योन्याश्रयी संबंध आहे. आपल्या बाळाचे कौतुक करण्यासाठी प्रतिभावंत आईने पाळणे रचले असतील. या पाळण्याचे धृवपद मात्र 'जो जो रे जो' किंवा 'जो बाळा जो जो रे जो' असेच आढळून येते. उदाहरणार्थ श्रीकृष्णाचा पुढील पाळणा पहा–

'मथुरेमध्ये अवतार धरिला । श्रीकृष्ण देवकीच्या गर्भासी आला ॥
तोडूनि बेडया बंद सोडीला । चरणांच्या प्रतापे मार्ग दाविला ॥
जो बाळा जो जो रे जो....

गोकुळामध्ये श्रीकृष्ण आला । नंदाच्या घरी आनंद झाला ॥
गुढयातोरणे शिखरी बांधती । कुसुमांचे हार तेव्हा वर्षती ॥
जो बाळा जो जो रे जो....

तिसऱ्या दिवशी वाजे वाजंत्री । तासे नौबती उत्सव करीती ॥

सर्वांच्या मुखी कृष्ण हा शब्द ।  ज्याचे छंदाने नाचे गोविंद ॥
जो बाळा जो जो रे जो....

चवथ्या दिवशी चवथ्या चौका ।  बाळ बाळंतीणीची न्हाणे होती ॥
लिंबे, डाळिंबे, नारळ आणिती ।  सख्या मिळोनी दृष्ट काढिती ॥
जो बाळा जो जो रे जो....

पांचव्या दिवशी पाटा पूजन ।  बांधीला फुलोरा वाक्या तोरण ॥
शिरी बांधीले आगळे पैंजण ।  खिरी भरली ताटे ठेविली वाढून ॥
जो बाळा जो जो रे जो....

असा हा पाळणा बाळंतपणाच्या पहिल्या दिवसापासून तो बाराव्या दिवशी बारश्यापर्यंत गायिला जातो. डोहाळचावरची गीतें मात्र गर्भधारणेच्या पहिल्या महिन्यापासून दहाव्या महिन्यापर्यंत गायिलेली आढळून येतात.

लावण्यांचे मात्र श्रीमती दुर्गा भागवत यांनी दोन प्रकार कल्पिले आहेत – १) शाहिरी लावणी. २ ) लौकिक लावणी. शाहिरी लावणी लोकसाहित्यात सामावत नाही परतु लौकिक लावणीचा लोकसाहित्याशी जवळचा संबंध आहे.

सणासुदीच्या गीतांमध्ये गौरीच्या गाण्यांचा, नागपंचमीच्या गाण्यांचा, दिवाळीवर, बंधु – भगिनी प्रेमावर लिहिलेल्या गाण्यांचा, तसेच मुंज, लग्नसोहळ्याच्या गीतांचाही अंतर्भाव लोकसांहित्यात होतो. उदाहरणादाखल अहिराणी गौरी गीत उद्धृत करतो –

नदी थडेनी चिकनी माटी तेना वटा बांधू जी.
तोज् वटा चांगला त तेवर घटचा मांडू जी.
तोज् घटचा चांगला त तेवर सोजी दऊ जी.
तीज् सोजी चांगली त तिना लाडू बाँधू जी
त्याज् लाडू चांगला त गौईराले वाढू जी.

नागपंचमीच्या सणाला मुली फुगड्यांचा खेळ खेळत असताना त्यांच्या मुखातून



परंपरागत लयबध्दतेने निघणारे गाणे ' फुगडी खेळू ग ऽ फु ऽ ग ऽ डी ' आणि पदन्यास ऐकल्यावर माणूस इतका तल्लीन होतो की त्यालाही त्या मुलीना म्हणावेसे वाटते की ' घ्या माझ्या हातात हात अन् खेळा माझ्याबरोबर फुगडो'. ती परंपरागत लयबध्दता व त्यानुसार पडणारे पदन्यास आपल्या हृदयाच्या कप्प्यात घर करून बसतात. त्या गाण्याची गोडीच मुळी अविट असते.

लोकगीतांचा संबंध ग्रामीण भागाशीअधिक येतो. सासुरवाशीणींना आपले दुःख किंवा आनंद व्यक्त करण्याची संधी जात्यावर दळण दळताना मिळत असे. वात्सल्यप्रेम माहेरची ओढ ती त्या प्रभातसमयी बाळास मांडीवर झोपवून जाते घरघरतांनाच व्यक्त करूं शकत होती. शिवाय शेतात काम करीत असताना मनाला विरगुळा व काम हलके वाटावे म्हणून सामूहिक गाणी म्हणण्याची पध्दत अस्तित्वात आली असावी. ' लावणी ' या काव्यप्रकारचा संबंध असाच रोपाच्या लावणीशी जुळवीत जातो.

लोककथांचे स्वरूप हे आंतरराष्ट्रीय असल्याचे प्रत्ययास येते. महाराष्ट्रात ज्या कथा असतील त्याच गुजराथ, कर्नाटक किंवा परदेशातहि आढळून येतात, मात्र त्यात थोडेफार परिवर्तन झालेले आढळून येते. ग्रामीण भागात रात्री वड, पिंपळाच्या पारावर किंवा मंदीरावर बसून कथा सांगण्याची प्रथा पहाण्यास मिळते. कथाकार हा आपली कथा रंगविण्याकरिता, रसिकांच्या मनावर तिचा परिणाम होण्याकरिता पद्यातूनहि साँगत असतो. परंतु त्याची चाल मात्र ' जी जी रे जी ' किंवा ' रिँ रिँयारीँ रीँ ' अशी पारंपरिक स्वरूपाचीच असते. शिवाय त्या कथांमध्ये अद्भूतता व चमत्कार यांचा प्रभाव आढळून येतो. श्रूती आणि स्मृती अशा परंपरागत पद्धतीने ह्या कथांचा प्रवास चालू असल्यामुळे त्यांचा ठसा एकजात असल्याचे प्रत्ययास येते. उदा.–

' एक होता राजा. त्याला होत्या दोन राण्या. एक आवडती व दुसरी नावडती ' ह्या साऱ्याचे दर्शन आपणास ' धृवा ' च्या गोष्टीवरून घडून येईल. तसेच ' आटपाट नगर होते. तेथे एक राजा राज्य करीत असे. राजा मोठा पुण्याचा, मोठा भाग्याचा ' असाही कथेचा प्रारंभ जाणावतो. कथेचा शेवट मात्र बोधवादी दृष्टीनेच केलेला असतो. सज्जनांना सुख व दुर्जनांना दुःख असाच शेवट जाणवेल.

या कथामध्ये पौराणिक कथा, दैंवतकथा यांचा समावेश झालेला असून त्यातून परंपरागत रूढींचे दर्शन घडत असते. कोणाही हिंदूची वड, पिंपळाला तोडण्याची

हिंमत होणार नाही, त्याला जाळणार नाहीत. उलट त्याची तो पूजा करील. कारण त्याला काहीतरी पौराणिक आधार आहे, वट ऋषि मानला जातो तर पिंपळ मुंजोबा सतीसावित्रीचा पति सत्यवान हा वडाच्या झाडाखाली मरण पावला परंतु सावित्रीने यमाला अडवून आंपल्या पतीचा प्राण परत मिळविला व वडाच्या झाडाखाली असलेले प्रेत जिवंत केले. या कथेमुळे अखंड सौभाग्यवती होण्यासाठी हिंदू स्त्रिया वटसावित्री पौर्णिमेला वडाची पूजा करतात.

उखाण्यांचाहि अंतर्भाव लोकसाहित्यात केला जातो. श्रीमती दुर्गा भागवत यांनी उखाण्यांचे तीन प्रकार मानले आहेत.

१ ) कोडयाच्या रूपाने उखाणे– उदा. मन्या मामान्या शंभर गाई, पहाटे उठीसन काईना माई. उत्तर– चांदण्या. ब ) हारीन पये दुध गये. उत्तर जाते. क ) एवढूसा गडू तेनामा बतीस लाडू. उत्तर– दात.

२ ) नाव घेण्याच्या रूपाचे– उदा. अ) नासिकची द्राक्षे, नागपूरची संत्री ........ माझे गृहमंत्री. ब ) भाजीत भाजी मेथीची ........ प्रीतीची.

३ ) लग्नात दोन्ही वऱ्हाडांनी एकमेकांना घालून पाडून बोलण्याचे किंवा स्तुतीपर. दोन गावातील स्त्रियांनी गौरीच्या प्रसंगी एकमेकींच्या उखाळ्या–पाखाळ्या काढणे, व खेळात मुली एकमेकींना लावून उखाणे घालतात त्यांचाहि समावेश होतो. शेवटी मात्र अंत्य यमक साधलेला असतो.

लोकसाहित्याचा कर्ता अनामिक असला तरी त्यात जीवनाचे चित्रण पहावयास मिळते. संस्कृतींचे दर्शन घडत असते. रूढी, संकेत, लोकधर्म यांचे प्रतिबिंब या साहित्यात पडते. म्हणून लोकसंस्कृतीचा अभ्यास करण्यास लोकसाहित्याचा अभ्यास अत्यंत महत्वाचा ठरतो. परंतु या या लोकसाहित्यसंकलनाची बुद्धी पूर्वी कोणा मराठी मनास झाली नाही. सुदैवाने १८६८ साली मेरी फ्रियरने 'Old Deccan Days' या पुस्तकाने मराठी लोकसाहित्याच्या संकलनास सुरुवात केली.

उत्कट भावनेच्या अखंड आविष्कारातूनच लोकसाहित्याची निर्मिती झाली असे आपणास आढळून येते. म्हणूनच कवितेची व्याख्या " Poetry is spontenious overflow of powerful feelings " अशी केली जाते. असे या साहित्याचे वैभव असूनही, आधुनिक साहित्यामुळे रसिकांच्या अभिरूचीमध्ये बदल घडल्यामुळे आज



त्याला उतरती कळा आलेली आहे. त्यात नवनिर्मितीची अपेक्षा नाही, उच्च कलेचा आदर्श नाही. संगीत व छंद यात एकचएक ठसा आढळून येतो. विविधता व नाविन्य मुळीच प्रत्ययास येत नाही. लोकसाहित्याच्या परंपरेला सिनेमासृष्टीने मोठाच धक्का दिला आहे. परंपरेने गायली जाणारी गाणी आज सिनेमाच्या चालीवर गायली जात आहेत. आजच्या तांत्रिक युगात ग्रामीण कामगारांना सवडीने शेतात काम करावयास वेळ नाही तर गाणी म्हणावयास कुठे वेळ मिळेल ? पिठाच्या गिरण्या आल्या आणि 'जाते' जाते झाले त्याचबरोबर माताच्या मुखी असलेले गाणेही जाते झाले. लग्न समारंभासारखा अपवाद वगळल्यास शहरी पांढरपेशी जीवनांत तर लोकसाहित्याचा पूर्णपणे अभाव जाणवतो.

# प्रीती

माळी ई. बी.
F. Y. B. A.

प्रीतीचे फूल तू –
सुगंध मला घेऊ दे.

प्रीतीचा चंद्र तू
चांदणे मज पिऊ दे.

प्रीतीची सरीता तू –
किनारा मला होऊ दे.

प्रीतीची साऊली तू –
विसावा मला घेऊ दे.

प्रीतीचे बोल तुझे –
साद मला घालू दे

प्रीतीच्या लोचनी तुझ्या –
मुर्ति माझी असू दे.

० ० ०

# माझा ईश्वर !

भागवत लाला भोई
S. Y. B. Com

मला बागेतील फुलझाडे आवडत नाहीत
कारण ,
ती नेहमी पुष्पवर्षावच करीत असतात
आणि मला तर कांट्यांविषयीच प्रेम वाटते
कांटे वर्षविणारा माझा प्रियतम आहे
माझा ईश्वर आहे
आणि अशा ईश्वराच्या
मी नेहमी शोधात असतो
कारण ,
असे कांटे वेदनांना प्रसवतात
आणि दुःखाला जन्म देतात
व
वेदना आणि दुःखात जगण्यात जो आनंद आहे
तो घेऊन
मी जीवनाच्या पथावर चालत आहे
कवि या वेदनांना साध्य म्हणतात
तत्ववेत्ते या दुखाला जीवन समजतात
मी या दोघांची बेरीज करून
पाटीवर लिहितो ,

हाच माझा ईश्वर आहे
हाच माझा ईश्वर आहे



" संजय वॉच कंपनी "
सर्व प्रकारच्या नविन घड्याळांच्या खरेदीसाठी
तसेच दुरुस्ती साठी विश्वासनीय—
संजय रेडिओ ट्रेडर्स
मर्फी रेडिओ व ट्रॉन्झिस्टर विक्रेते
* तसेच – इलेक्ट्रिक सामान आणि रेडिओ स्पेअर पार्टस् साठी *
प्रो. वाणी बंधू
१०२, पोलन पेठ, दाणा बाजार
जळगांव

आकर्षक फॅशनचे टेरीकॉट, टेरेलीन तयार कपडे
योग्य व माफक भावात मिळण्याचे एकच ठिकाण
" सुरेश रेडीमेड स्टोअर्स "
८७, फूले मार्केट, जळगांव
उत्तम शर्ट, सुटपॅन्ट, नवीन डिझाईनचे फ्रॉक, उलन स्वेटर
मफलर्स, लेडीज कोट, जरसीचा भरपूर स्टॉक
एक वेळ अनुभव हीच खात्री




# असेही एक ' मनोरंजन '

श्री. श्यामकांत हरी कुळकर्णी

T. Y. B. Com.

रविवारचा दिवस असल्याने सर्वसाधारण मुंबईकराप्रमाणे मीसुद्धा दुपारची विश्रांती म्हणून चक्क चार तास झोप काढली होती.

आमच्या सौ. ने चहाच्या निमित्ताने अगदी गदगदा हलवून मला जागे केले. तेव्हा आळोखेपिळोखे देत मी उठलो. तेवढ्यात–

' अहो चला आज सहाच्या शो ला जायचय म्हटलं आपल्याला. तुमची झोप आवरा आता '

दुपारच्या जेवणाच्या वेळी दिलेल्या आश्वासनाची आठवण करून दिल्याने सौ. च्या स्मरणशक्तीवर मी खूष झालो. सिनेमाचे नाव काढल्याबरोबर बायकांना कामाचा उत्साह येतो अन् मग घरात कुठलेही काम ' पेंडिंग ' म्हणून राहत नाही. या सर्व साधारण नियमाला आमची सौ. अपवाद नव्हती. तिनेही दुपारची सर्व कामे अगोदरच आटोपून ठेवली होती.

अन् शेवटी चहा ठेवून मला जागे केलेच. तेवढ्यात–

' काय ' आहेत काय घरात ? ' अशी दारातूनच हाक मारून बंडोपंतानी घरात प्रवेश केला. बंडोपंत शिंगरे हे आमच्या चाळीतील अत्यंत ' गप्पिष्ट ' सद्-गृहस्थ. एखाद्याकडे सहज म्हणून गप्पा मारायला जायचे अन् तास तास बैठक मारून त्याला अक्षरश: ' बोअर ' करण्याची कला बंडोपंताना अवगत होती.

बंडोपंताचे मी उसने हास्य आणून स्वागत केले. अन् चहाचे प्रमाण वाढविण्याची घरात सूचना केली.

बंडोपंत आपला किती वेळ घेणार अन् त्यामुळे आपला सिनेमाचा बेत निकालात निघणार की काय या स्वाभाविक शंकेने मी विघ्नहर्त्याचे स्मरण केले. बंडोपंतानी इकडच्या तिकडच्या गप्पा सुरु केल्या व त्यांचे अरिष्ट कसे टाळता येईल याचा विचार मी करु लागलो. तेवढ्यात सौ. ने चहा आणला व जाता जाता 'चला आटोपा लवकर आपणास निघाले पाहिजे ' असा इशारा दिला.

' काय हो कुठे जाण्याचा बेत आहे आज ? ' इति बंडोपंत

'अहो बरेच दिवस झाले, हिचा माटुंग्याचा मामेभाऊ बोलावितो आहे. म्हटलं आज जावून यांव ' मी म्हणालो.

' हो हो जावून या की ' बंडोपंतांनी पोक्त सल्ला दिला.

मीही कपडे करुन तयार झालो, अन् सौ. ने तयार होऊन निघण्याची घाई सुरु केली. आज आपला जम बसला नाही म्हणून नाऊमेद होवून बंडोपंतांनी उरलेले सुपारीचे खांड फस्त करीत घरचा रस्ता धरला. आम्हीही उभयता एक संकट टळले म्हणून खुष झालो. अन् पप्पूला घेवून ( संसार वेलीवर उमलेले पहिले फूल असे सौ. त्याचे वर्णन करते ) बस स्टॉपचा रस्ता धरला.

नेहमीप्रमाणे बसस्टॉपवर गर्दी होतीच अन् ती सर्व सिनेरसिकांची होती हे काही वेगळे सांगायला नकोच. ' क्यू ' मध्ये उभे राहून आम्ही बसची प्रतीक्षा करु लागलो. सौ. मुंबईत नवखी असल्याने ' शिकाऊ ' उमेदवाराप्रमाणे मी तिला वागवीत होतो

बस आली की ' एरॉस २ ' एवढेच म्हणावयाचे व कंडक्टरच्या हातात पल्लात पैसे ठेवावयाचे एवढे मी तिला सांगून ठेवले होते.

नेहमीप्रमाणे बस आली व तिच्यात नियमाप्रमाणे गर्दी होतीच. हळूहळू रांग पुढे सरकू लागली. तिकिटे आंत देतो असे सांगून कंडक्टरने सौ. पर्यंत लोक आत घेतले. व मला ' जगा नही ' असे सांगून नेहमीप्रमाणे बेल मारुन बस निघून गेली.

मी खाली राहून गेल्यामुळे आमच्या सौ. ने ' अहो थांबवा ते खालीच राहिले ' असे घाबरून दोनतीत वेळा कंडक्टरला विनवून पाहिले. परंतु तिची ' मऱ्हाठी ' भाषा न समजल्याने किंवा असले प्रकार सवयीचे झाल्याने त्यानेही दुर्लक्ष केले. आपण मुंबईत नवखे असल्याने आपण चुकलो किंवा एकटे पडलो तर केवढा अनर्थ होईल या कल्पनेने व्याकूळ होवून आजूबाजूच्या प्रवाशांकडे केविलवाण्या नजरेने पाहिले. शेवटी एका प्रवाशाने ' अहो येतील मागच्या बसने ' असा दिलासा दिल्यावर तिची धडधड थांबली. एवढ्यात ' एरॉस ' चा स्टॉप आला व कंडक्टरने तिकीटाविषयी विचारताच ' एरॉस २ ' असे पढवल्याप्रमाणे सांगून तिने २ तिकीटे घेतली. व ' एरॉस ' ला बावरलेल्या हरिणीप्रमाणे ती उतरली. ( हा किस्सा तिने मला ' खाजगीत ' ऐकविला. कारण बालपणापासून तिचे वेंधळेपणाचे सर्व किस्से तिने मला ' खाजगीतच ' ऐकवले आहेत. )

शेवटी १५ मिनिटांच्या अंतराने मीही एरॉसच्या स्टॉपवर येवून धडकलो अन्



अगदी रडकुंडीला आलेल्या सौ. ची कशीतरी समजूत घालून आम्ही थिएटरच्या आवारात शिरलो.

अगदी नको त्यावेळी ओळखीची माणसे भेटावीत अन् त्यांनी वेळ घ्यावा अन् त्यामुळे आपले बेत फिसकटावे हा आजचा योग होता. अगोदरचा शो पाहून बाहेर पडलेल्या गर्दीतून समोरून येणाऱ्या दोन तरुणींनी आमच्याकडे मोर्चा वळविला.

" हॅलो सुलू ! तू आज इकडे कशी काय ? " एकीने विचारले.

" बरेच दिवसांनी भेटलीस ग, अगदी लग्नालासुद्धा बोलाविले नाही हं ? " दुसरीने टोला मारला.

' अग तुमचे पत्तेच माहित नव्हते. त्यामुळे बोलाविता आले नाही ' सौ. ने जनरल टोलवाटोलवी करून वेळ मारून नेली.

त्यांच्या पुढील संभाषणामधून मला एवढच कळले की त्या सौ. च्या माहेरच्या मैत्रिणी होत्या. व त्यांची नावे कुंदा व मंदा अशी होती.

' हे कोण ? तुझे मिस्टर का ? बराच वेळ मी बाजूला पप्पूला घेवून उभा असल्याने एकीने चौकशी केली.

' होय हे मिस्टर व हा पपू ' एकाचवेळी सौ. ने दोघांची ओळख करून दिली.

कुंदा – मंदा प्रकरण कधी निकालात निघेल याची मी वाट पहात होतो. परंतु माहेरच्या मैत्रिणी भेटल्याने सुलू उर्फ सौ. ला अत्यानंद झाला होता व त्या आनंदाच्या भरात तिला वेळेचे भान राहिल असे दिसत नव्हते. अगदी तत्कालीन मैत्रिणींपैकी कुणा कुणाची लग्ने झालीत पासून तर कुणाला किती मुले झालीत व कुणाला नयऱ्याने टाकून घातले पर्यन्त; सर्व इत्थंभूत माहिती कुंदा मंदानी पुरविली.

एव्हाना थिएटरवरची गर्दी बेसुमार वाढली होती. त्याच वेळी कुंदा–मंदांनी समोरच्या कॅफेकडे बोट दाखवून कॉफी घेण्याचा आग्रह केलाच अन् मी मात्र तेव्हापासून पिक्चर सापडण्याची उरली सुरली आशा सोडून निमूटपणे कॅफेकडे चालू लागलो. माहेरच्या मैत्रिणींच्या आग्रह – भिडेमुळे सौ. ला वा पर्यायाने मलाहि मोडता आला नाही.

कॅफेत आल्यावर ' स्पेशल रुम ' मधून सुलूच्या मैत्रीणींना कॉफीची ऑर्डर आज कुठे जाण्याचा बेत होता येथपासून चौकशी करुन नुकत्याच पाहिलेल्या चित्रपटावर त्यांनी कॉमेंट्स् सुरु केल्या.

' अग डॅम बोगर तो ' मनोरंजन ' एक मैत्रीण

' अग आम्ही तोच बघणार आहोत आता ' सुलू म्हणाली.

' अग तू तो ' ईर्मा ला दूस ' फ्रेंच चित्रपट बघितलास का ? त्याच्यावरच " मनोरं... हिंदीत निघाला आहे. ' इति मंदा. सुलूला मुंबईत येवून केवळ तीन महिने झाले हो... तेवढ्या काळात आम्ही प्रथमच सिनेमाला निघालो होतो. त्यामुळे हिंदी चित्रप... नावे देखील कानावरुन न गेलेल्या सौ. ला 'इर्मा ला दूस ' हा फ्रेंच चित्रपट आ... व त्यावरुन हिन्दीत–

' मनोरंजन ' निघाला असेल ह्यापैकी कसलीच माहिती नसल्याने ति... चेहऱ्यावर भलेमोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले.

' अगं शम्मीने पासेस पाठविले तरी जावू नको बघायला. " कॉफीचा घोट घेत सु... म्हणाली.

' कोण शम्मी ' कुतुहलाने सौ. ने विचारले.

' अग शम्मीकपूर प्रोड्यूसर आहे ' मनोरंजन ' चा.

' असं ' मला वाटलं, शम्मी म्हणजे कुणी आणखी ' एरॉस ' चा मॅनेजर वगैरे

शम्मीकपूर सारखा निर्माता आम्हाला कशाला पासेस पाठविणार आहे. पण... असुकने जरी पासेस पाठविले तरी जाऊ नका असा एखाद्या चित्रपट समीक्षकाप्रमा... कुंदा–मंदानी आम्हाला सल्ला दिला.

शेवटी कॅफेतून बील चुकते करून अन् सावकाश पुढे केव्हातरी घरी येण्याचे आश्वासन घेऊन सुलूच्या मैत्रिणींना आम्ही निरोप दिला. अन् ' एरॉस ' वर येऊन पाहतो तर ' मनोरंजन ' साठी गर्दीचा डोंब उसळला होता. कसेतरी सौ. ने रांगेत बस्तान बसविले अन् दहाच मिनिटात तिकीटविक्री बंद झाली. हिरमुसली होऊन सौ. पैसे घेवून आली. अस् ' हाऊसफुल्ल ' चा बोर्ड झळकला अन् ' ब्लॅक ' वाल्यांनी धंदा सुरू केला. ' चलो भाई साडेतीनका सात ' पासून ' पाचका दस ' पर्यंत भाव कडाडले.

' ब्लॅकने ' तिकीट घेऊन बघण्याइतके ' मनोरंजन ' त्यात नसल्याने आम्ही परत फिरण्याचा सोयीस्कर निर्णय घेतला. चौपाटीवरून भेळपुरीची चव घेवून आम्ही सात।च्या सुमारास बसस्टॉपवर आलो. नेहमीप्रमाणे परतणाऱ्या बसेसनासुद्धा



होतीच, कसेतरी प्रवेश मिळवून आम्ही परतीचा प्रवास सुरू केला. गर्दीत नीट उभेहि रहाता येत नसल्याने सौ. ने वरच्या जाळीच्या ' रॅक ' मध्ये तिची ' पर्स–कम–बॅग ' ठेवून दिली.

आमचा स्टॉप येताच नेहमीप्रमाणे आम्ही चटकन् उतरून गेलो. घरी येवून कुलुप उघडण्यासाठी ' किल्ली ' पाहतो तर ' पर्स–कम–बॅग ' बसमध्येच राहून गेल्याचे लक्षात आले. सौ. च्या वेंधळेपणाचा हा दुसरा नमुना.

' पर्स – कम – बॅग ' बसमध्येच राहिल्याने आता किल्लीचा प्रश्न निर्माण झाला. आमचे कुलुप देखील गोदरेजसारखे 'जनरल ' नसल्याने शेजाऱ्यांच्या चाव्यांना त्याने दाद दिली नाही. तरीही कुलुपाची किल्ली हरविल्याचे वृत्त आमच्या आळीत पसर ताच प्रत्येक घरातून कुणीना कुणीतरी जुन्या नव्या असतील नसतील तेवढ्या किल्ल्या घेवून आमच्या घरी हजर झाले.

' अहो ही लावून बघा ' ' अहो ती लावून बघा ' अशा गोंधळात आमच्या कुलुपावर इतक्या किल्ल्यांचे प्रयोग झाले की कुलुपाच्या ह्यातीत तेवढे प्रयोग झाले नसते. शेवटी कुठल्याही. किल्लीने न उघडल्याने आळीतील सर्व अतिउत्साही नागरीक नाउमेद होवून परत गेले.

आम्ही ' किल्ली ची काय व्यवस्था करावी या विचारात होतोच. पर्स सापडण्याची शक्यता नव्हतीच म्हणजे किल्लीसह आतील दहा रुपये गेले' या विचाराने सौ. व मी व्याकुळ झालो.

शेवटी तूर्त तरी आम्ही बंडोपंतांकडे मुक्काम हलविला. तास दीड तास गप्पा मारल्यावर अचानक ' बेस्ट ' ( B. E. S. T ) च्या ' हरविलेल्या वस्तूंच्या ' विभागात ( lost property ) चौकशी करुन येण्याचा विचार माझ्या मनात चमकून गेला, म्हणून त्वरित मी रात्री साडेदहाला निघालो. अकराच्या सुमाराला मी बेस्टच्या कार्यालयात येऊन पोचलो. अन् ' हरविलेल्या वस्तूंच्या ' विभागात जाऊन मी तेथल्या कारकुनाजवळ चौकशी केली. त्याने कुठल्या बसमधून कोठपर्यंत प्रवास केला याची नोंद एका रजिस्टरात करून घेतली.

मी ती माहिती पुरविल्यावर ती बस ' सेंट्रल डेपोत ' रात्री १२ नंतर ड्यूटी

संपवून येते असे, त्याने सांगितले. बारापर्यंन्त प्रतिक्षा करणे भाग होते. तेवढ्या वेळा अनेक 'विसराळू' प्रवासी येवून गेलेत. कुणाची ब्रीफकेस, तर कुणाचे पुस्तक, कुणा पर्स, तर काहींच्या छत्र्या अशा नानाविध वस्तु तेथे जमा झाल्या होत्या. अन् ओळ पटवून प्रत्येकजण त्या घेवून जात होते.

शेवटी साडेबाराला ती बस 'सेंट्रल डेपोत' जमा होवून कंडक्टर महा हातात दीत तीन पर्सेस, एक जाड पुस्तक अन् दोन तीन लेडीज छत्र्या एवढा लवाजम घेवून त्या कार्यालयात हजर झाले. त्यात आमचीही पर्स सुखरूप होती. हे पा माझ्या जीवात जीव आला. ओळख पटवून व आतील वस्तू तशाच आहेत याची खा करून व 'बेस्ट' च्या प्रामाणिक यंत्रणेचे आभार मानून ( कारण त्यावेळी कंडक्टर चहा पाजण्याची वेळ नव्हती म्हणून ) मी तेथून टॅक्सी करून परत घरी आलो.

अर्धवट झोपेत असलेल्या सी. ला तेवढ्याच रात्रीही आपली 'इंपोर्टेड' पर्स परत मिळाल्याचा आनंद झाला. शेवटी 'कुलुप उघडून रात्री दीडला आम्ही गृहप्रवेश केला. त्यानंतर जेवण आटोपून झोपता झोपता मध्यरात्र झाली. 'मनोरंजन' तर पाहिला नाहीच परंतु दुसरेच 'मनोरंजन' झाले. यानंतर सी. ला सिनेमालातरी मी बरोबर नेले नाही.


## दानमल वर्मा ॲन्ड सन्स

सोन्याचे चांदीचे फॅन्सी दागिने

तसेच

चांदीचे सर्व प्रकारचे दागिने, तोरडवा, कडदोरे व भांड्यांचे व्यापारी –

–: एकवेळ अवश्य अनुभव घ्यावा :–




# डॉ. आंबेडकरांचे व्यक्तिमत्व


सुरवाडे अरुण माधव

S. Y. B. Com.


डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रकांड पांडित्य डॉ. भांडारकरांच्या विशाल विद्वत्तेहून अमळ निराळे होते. त्यांच्या ज्ञानात भांडारकरांचा शांत नि अखंड व्यासंग असून टिळकांच्या संशोधनबुद्धीची झेप होती. त्यात तपश्चर्येचे तेज होते. न्यायमूर्ती रानड्यांच्या बुद्धीप्रमाणे आंबेडकरांची बुद्धी मूलगामी होती. पं. नेहरूंनी त्यांना नियोजन समितीचे प्रमुख नेमण्याविषयी अभिवचन देऊन मंत्रिमंडळात घेतले होते. एवढा अष्टपैलू बुद्धीचा राजकारणी धुरंधर नेता त्यांच्या भारतीय समकालीनांत बहुधा सापडणे अशक्यच !

डॉ. आंबेडकर खऱ्या अर्थाने विद्यासागर होते. सायंकाळी वाचनास सुरूवात झाली म्हणजे सकाळी लाडका कुत्रा जवळ येताच वा दुधवाल्याच्या भाड्यांचा रस्त्यात आवाज ऐकताच प्रभात झाली असे समजून उठावे ! विजनात वाचनालय ठेवून तेथेच रहिवास करावा अशी मनीषा बाळगणारा हा खरा समदर्शी ज्ञानेश्वर ! ग्रंथासाठी गृह उभारून त्या ज्ञानभांडारात अहोरात्र मनन करणारा हा खरा बृहस्पती ! आंबेडकरांची अखंड ज्ञानसाधना पाहून मोठे, जाडे, गाढे विद्वान त्यांना मानवंदना देऊन परत फिरले. त्यांना संस्कृत शिकविण्यास ब्राम्हण गुरुजींनी नाकारले. परंतु त्यांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व पाहून द्रोणाचार्यांचा नक्षा उतरविणाऱ्या एकलव्याची आठवण व्हावी. ज्याने शिक्षण घेणे हे पाप समजले जाई, त्याने ज्यांचे एक विद्यापीठच होईल अशी अनेक महाविद्यालये स्थापन करावी हे केवढे आश्चर्य आहे ! 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' आणि 'यः क्रियावान सः पंडितः' या दोन वचनांचा स्पृहणीय मिलाप आंबेडकरांच्या जीवनात झालेला आढळतो.

वज्राहून कठीण दिसणारे आंबेडकर मनाने कुसुमासारखे कोमल होते. आपला आवडता कुत्रा मरण पावला असता स्फुंदून स्फुंदून रडणारे, लाडका मुलगा कालमुखी पडला असता त्याचे शव मांडीवरून तासन् तास न सोडणारे, पत्नी कालवश झाल्यावर आक्रोश करणारे नि वडील मृत्यू पावताच आकांत करणारे आंबेडकर प्रसंगी परवासाठी कठोर जमदग्नी होत. ! 'गांधीच्या प्राणापेक्षा मला माझ्या दलित बांध-

यांचे हित अधिक श्रेष्ठ वाटते ' असे त्यांनी हिंदु पुढाऱ्यांना पुणे-करारापूर्वी निर्भ सांगितले. महात्मे नुसता प्रचाररूपी धुळीचा लोट उठवितात. दलितांच्या जीवना पातळी उंचावू शकत नाहीत, हे त्यांनी महात्मा गांधींना तोंडावर सांगावयास केले नाही.

आंबेडकरांची गंभीर मुद्रा ते संतप्त झाले म्हणजे अधिक उग्र दिसे. अशावेळी गतयुगात पिचून कालमुखी पडलेल्या अस्पृश्यांच्या आत्म्यांचा तळतळाट नि संता त्यांच्या डोळ्यातून जणू धगधगत्या ज्वाळांच्या रूपाने बाहेर पडत आहे असे वाटे ! सर्व जगाच्या तिरस्काराबद्दल तुच्छता व्यक्त करणारी त्यांची हनुवटी, वादळातील जीवननौकेला व खंबीर सुकाणाप्रमाणे अचुक मार्गदर्शन करणारी त्यांची नासिका आणि प्रभावी वाणी, भव्य रुंद कपाळ, लांबट गोल चेहरा, भव्य देहयष्टी ह्याती संपन्न अशा त्यांच्या प्रभावी व्यक्तित्वाकडे पाहणाऱ्यांच्या मनावर आपोआप आदरयुक्त वचक बसे. बाबासाहेबांचे मन प्रसन्न असता त्यांच्याकडून दहा मिनिटांत जेवढा विनोदाचा आनंद लुटायला मिळे, तेवढा अन्य राजकीय पुढाऱ्याकडून दहा वर्षात मिळत नसे त्यांचे संभाषण म्हणजे ज्ञानकोशाचे सारच ! आंबेडकर खरे रसिक होते. संगीत, चित्रकला, उत्तम फाऊंटनपेन, तऱ्हेतऱ्हेचे बूट, आधुनिक वेष यांचा त्यांना षोक होता.

डॉ. आंबेडकर हे केवढे विराट पुरुष ! ज्याला बाल्यावस्थेत हिंदु समाजाने पायाखाली तुडविला, ज्याचा शाळेत, महाविद्यालयात गाडीत, देवालयात, सरकारी कार्यालात स्पृश्य समाजाने तेजोभंग, मानभंग केला, ज्याची विटंबना केली, ज्यांच्या पूर्वजांच्या शंभर पिढ्या स्पृश्य समाजाने सामाजिक गुलामगिरीत कुजविल्या, तो महारांचा मुलगा, आपले विशाल बुद्धिसामर्थ्य, प्रचंड उद्योगशिलता, अखंड व्यासंग, लोकोत्तर धैर्य, स्वसुखभोगपराङ्मुखता, अलोट त्याग, दीर्घकालीन सेवा, ध्येयावरील अढळ निष्ठा, प्रकांड पांडित्य ह्या गुणसमुच्चयाने विधानशास्त्र, तत्वज्ञान ह्या विषयांवरील असामान्य प्रभुत्व संपादन करून लढत लढत, घणाचे घाव सोशीत सोशीत, प्रसंगी लवचिकपणा दाखवीत, संपादक, इतिहासकार नि प्राचार्य झाला. तो समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, निबंधपंडितही झाला. तो मजूर पुढारी, मजूरमंत्री, महाविद्यालयांचा संस्थापक, निबंधमंत्री झाला. राष्ट्राच्या राज्यघटनेचा तो प्रमुख शिल्पकार ठरला ! ज्या समाजाने त्याला पायाखाली तुडविले, त्याच समाजाने त्याला डोक्यावर घेऊन 'आधुनिक मनू' म्हणून गौरवाने नाचविले ! धुळीत जन्मास येऊन तो जगातील धुरंधर पुरुषांच्या मालिकेत जाऊन बसला !

आंबेडकरांचे जीवन हा एक मार्गदर्शक दीप आहे. या दीपाच्या प्रकाशात



त्यांच्या व्यक्तिमत्वामुळे ज्ञानाला नवे पीठ लाभले आहे. काव्याला नवीन स्फूर्तिस्थान मिळाले आहे. यात्रेला नवीन तीर्थस्थान प्राप्त झाले आहे, साहित्यास नवे क्षेत्र सापडले आहे. आणि भक्तांना नवीन स्फूर्तिस्थान मिळाले आहे.

उत्तम व आकर्षक फोटोकरीता –

" आजिंठा फोटो स्टुडिओ "

आऊट डोअर ग्रुप

तसेच

समारंभाचे फ्लॅश फोटोकरिता एकदा अनुभव घ्या.

: अजिंठा फोटो स्टुडिओ

जैन मंदिरा मागे

जळगांव

स्वच्छता व आधुनिक फर्निचरसाठी

卐 प्रसिध्द असलेले 卐

कांती रेस्टॉरंट -

स्पेशॅलीटी :– कचोरी, कलाकन, बटाटावडा

Also, Tea, Coffee, Sweets, & Salties

स्थळ :– जुन्या एस. टी. स्टँडसमोर, जळगांव

# जीवन म्हणजे काय ? ”

शरद निफाडकर

Jr. M. Com.

आयुष्याची भैरवी गाताना, कहाणीचा शेवट होताना,
जन्मभरात पहिलाच प्रश्न विचारला तिने,
“ जीवन म्हणजे काय ? ”

डोळयांच्या सागरात तांडवनृत्य करून
अश्रूंच्या लाटा फुटून चूर झाल्यात, माझ्या पापण्यांच्या किनाऱ्यावर

आता फक्त,

जीवनाचा शेवटचा अंक संपण्याची वाट पहाताना
अश्रूंनाच सोबतीला घेऊन विचार करायचाय
तिच्या प्रश्नाचं 'अश्रू' हेच का होतं मूक उत्तर ?

अन् पडदा पडता पडता विचारायचाय जगालाही
ओरडून तोच प्रश्न.
कारण आज मलाही, तिने विचारलेल्या पहिल्या अन शेवटच्याच
प्रश्नाचं उत्तर हवं आहे !

क्षितीजाआड असणारं –
शब्दांच्या जगापलीकडे असणारं उत्तर हवं आहे !





श्री. तानाजी भोईटे
जिमखाना जनरल सेक्रेटरी व
जनरल सेक्रेटरी
वार्षिक स्नेहसंमेलन
१९७४ – ७५



श्री. दत्ता कोल्हे
मॅगेझीन सेक्रेटरी
१९७४ – ७५



श्री. घनःश्याम जोशी
डिबेटिंग सेक्रेटरी



श्री. भरत बेंडाळे
भू – विज्ञान मंडळ सेक्रेटरी



श्री. एल. टी. देशमुख
पुणे विद्यापीठ फुटबॉल संघ,
निवड समिती सभासद
१९७४ – ७५



कु. रशिदा मास्टर
आंतर महाविद्यालयीन स्त्री विभाग
ॲथलेटिक्स चॅम्पिअनशिप
भाला फेक– प्रथम क्रमांक,
उंच उडी व लांब उडी– दुसरा क्रमांक
१९७४ – ७५



कु. व्ही. बी. कुळकर्णी
बेस्ट स्टुडन्ट
१९७४ – ७५



श्री. नन्दु सावन्त
आंतर महाविद्यालयीन वैयक्तिक स्पर्धा–
२०० मीटर धांवणे– प्रथम क्रमांक
१०० मीटर धांवणे– दुसरा क्रमांक
१९७४ – ७५

# माणूस :- एक चिंतन

*रामदास बाळजी उर्फ बात्या शिगनूरकर*
मु. जे. कॉलेज कार्यालय

मनुष्य व इतर योनी यात फार फरक आहे. माणसाचे अंतःकरण चतुष्टय म्हणजे मन, बुद्धी, चित्त, अहंकार याद्वारे जीवन व्यतीत होते. या जगात मानवप्राणीच असा प्राणी आहे की, त्याला मानवजन्माला येऊन मानवता ही प्रयत्नाने मिळवावी लागते. मनुष्य हा समाजात रहाणारा प्राणी आहे. मनुष्येतर प्राण्यामध्ये बुद्धिसामर्थ्यं नसल्यामुळे त्यांची समाजघटना विशेष गुंतागुंतीची नाही. मनुष्याचे बुद्धिसामर्थ्यं विशेष असल्यामुळे नवीन सुखसाधने उत्पन्न करून आयुष्यक्रम अधिक सुखसोयींनी युक्त करण्याचा प्रयत्न तो करीत असतो, म्हणून समाजामध्ये मनुष्य रहातो.

जोपर्यंन्त माणसात जगण्याची हौस ही कायम आहे, तोपर्यंन्त त्याच्यात पुरुषार्थ करण्यास लागणारी मानसिक शक्तीही कायम रहाते. इष्टमित्र हे माणसाला अवगुणांची जाणीव स्वेच्छेनेच करून देत असतात. वारंवार दोषांचे वाचन करीत रहाणे, ही उपदेशाची रीत म्हणता येत नाही. उपदेशकास चांगले काय आणि वाईट काय हा उपदेश रूचेल, अशी त्याच्या मनाची अवस्था देखील घडवून आणावयास पाहिजे. तोच खरा धर्म असतो. प्रसंगी स्वाभिमान हा अनर्थकारीही ठरू शकतो, हे कळूनही वळत नसते. सल्ला हा नेहमी योग्य मिळेलच याचा नेम नसतो. अशा वेळी आपल्या आप्तेष्ट हे आपले हितचिंतक नाहीत, असे वाटू लागते. यावेळी माणूस अनेक प्रकारच्या एकाकीपणाचा अनुभव करू लागतो. अपयश हे माणसाच्या अनेक प्रकारच्या स्वरूपाचे फलरूपात असते. कोणत्याही वस्तूंविषयी जिज्ञासा, निरीक्षण, परीक्षण, प्रयोग, तर्क ही पाच बुद्धिवादाची अंगे आहेत. यांपैकी एक जरी कमी असेल, तर तो बुद्धिवाद नाही. मनुष्य जरी भविष्याच्या अंधारात जगत असला, तरी त्याच्या अंतःकरणात अज्ञानामुळे अशा भविष्यासंबंधी दुर्गम्य आशा वसत असते. भविष्याची आशा जर जोरदार नसेल, तर अंतःकरणात आशेने वर डोके काढण्याचा प्रयत्न करावा व लगेच वैफल्याच्या भावनेने तिच्या डोक्यात घाव घालावा असे घडून जाते.

सर्वसाधारण माणसाने जो विचार करावयाचा, तोच मुळी कागदावर करावयास शिकावा. त्याने विचार करण्याची रीत सुधारते आणि ज्याला काही लिहिण्याची इच्छा असेल, अशा मंद व्यक्तीसही आरंभी बरेच कष्ट पडले तरी लिहिता येते. काजव्याचे सर्व शरीर कसेही असले, तरी त्यामागे जसा मोहक प्रकाश असतो त्याप्रमाणे अपयश इतर बाबतीत कसेही जरी असले, तरी त्याच्या मागे दिव्य प्रकाश व विधायक शक्ती असते. जो ईश्वरनिष्ठेची मात्रा घेतो, त्यास हे त्याचे पुढील शरीर जर्जर करीत नाही. तो सुरक्षित रहातो आणि त्याला पुढील वाट अथवा प्रकाश व सामर्थ्य प्राप्त होते.

लोकांना वागवून घेताना खाली येणे हा कमीपणा नाही. माणसाच्या स्वव्यवहाराची पातळी खाली येणे, हा माणसाचा कमीपणा समजू नये, व हे जमणे म्हणजे आत्मोन्नती आहे. माणसाने लोकमतापेक्षा आपल्या कृतीवर, वागणुकीवर अधिक लक्ष द्यावे व आपल्या वागणुकीचा विश्वास धरावा. लोकमताचे यथार्थत्व समजून घेणे हे देखील मोठे महत्कार्य आहे. या पवित्र कार्याचे जीवनात फार मोठे स्थान आहे. नियम साधण्याने काम अंगवळणी पडते, काम अंगवळणी पडले म्हणजे सवय लागते, सवयीने काम सुलभ व सोपे होते आणि काम सोपे झाल्याने अधिक प्रमाणात सुबक होऊ लागते. जो मनुष्य बाह्य किरकोळ कारणामुळे भावनेच्या आहारी जातो, त्याच्या हातून नियम पाळला जाणे अशक्य असते. कोणत्याही परिस्थितीत कार्यप्रविण जो होतो, त्याचाच नियम चालतो. मनाचा जसा शरिरावर तसाच शरिराचाही मनावर परिणाम होत असतो. अनुभवामध्ये शारिरीक किती, व मानसिक किती हा विचार होणे जरूर असते. समाजात उदारचरित माणसे समाजाच्या प्रारंभिक अवस्थेपासून फार कमी पहावयास सापडतात. तरूण मंडळी आणि व्यवहार-कुशल माणसे यांच्यात या कारणाने मतभेद होतो.

परिस्थितीच्या कोंडीत माणूस सापडला म्हणजे आपले सारेच चुकले, असे वाटून त्या ठिकाणी एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो. यामुळे सारे जग हे एकदम बदलल्यासारखे वाटते. कोणी आपणास विचारल्यास फार झाले तर हा एक लांब सुस्कारा टाकतो व आपण दुःखी अगर निराश आहोत, याची एकपरीने कबुली देतो. त्याला रडावेसे वाटले तर ज्याच्याजवळ रडता येईल, अशी त्याला पाहिजे असी अधिकारी व्यक्ती कोणी दिसत नसते. अशावेळी तो ज्ञानी माणसाजवळ जातो. कर्म हे जीवनाचे एक अविभाज्य घटक असते. अंतःकरणातील जगण्याची ही सतत प्रेरणा क्षणोक्षणी माणसास काम कर हेच सांगत असते.



कर्म आणि त्याचे फळ यांचे संबंधात अनियमितपणा व अनिश्चितता ह्या नेहमी अनुभवास येत असल्याने ईश्वरवाद हा जन्माला आला. ही जीवनाची वास्तवताच असल्यामुळे तो सुस्थिर आहे. म्हणून देव देव करणे, ही एक मानवी जीवनाची गरज आहे. ह्या सिद्धांताविषयी जुने पंडीत व इतर मंडळी यांच्या ग्रंथांतून एक वाक्यताच आहे.

अर्थशास्त्रात श्रमाला मूल्य आहे, पण कष्टाचे मोल हे ज्याचे त्यानेच समजावयाचे असते. माणसाला त्याचे जीवनच कष्टप्रद वाटू लागले तर कोणत्याच कामासाठी त्याच्याजवळ उत्साह नसतो.

माणसाचा मूळ स्वभाव आत्मप्रेरणेनेच काम करण्याचा असतो. परंतु या जगात अनुभवाची आणि बुद्धीची जोड प्रत्येकाच्याच वाट्याला सारखीच येत नसल्यामुळे मनुष्य हा जर प्रारंभापासून आजवर केवळ स्वप्रेरणेच काम करीत आला असता, तर आज झाली आहे ही माणसाची प्रगती कधीच झाली नसती. जगात नेहमीच धाडसी आणि बुद्धिमान अशी माणसे स्वप्रेरणेनेच काम करीत असतात. व सर्वसामान्य माणसे ही त्यांच्या मागून परिस्थितीच्या दबावामुळेच काम करीत असतात. जिवंत रहाणे, हे स्वयमेव एक तपच आहे. त्याच्या अंतर्भूत असणाऱ्या साऱ्या गोष्टी कष्ट घेऊन नित्याभ्यासाने प्राप्त होत असतात. सर्व माणसे वर्तमानातच जगत असतात. परंतु काही भूतकाळात रंगलेली तर काही भविष्यकाळाची जिज्ञासू आणि काही वर्तमानकाळात गढून गेलेली अशी तीन प्रकारची माणसे आपण पहातो. तथैव कोणत्याही काळाशी आपला संबंध व सलोखा न ठेवणारीही माणसे असतातच. माणसाचे पाऊल विचाराप्रमाणेच आचाराने पुढे पडल्याशिवाय त्याचे जीवन गतिमान ठरत नाही. माणसाच्या जीवनाला जर गती नसेल, तर त्याच्या प्रगतीचा त्याला फारसा उपयोग नाही. गती आणि प्रगती ह्या हातात हात घालून चालू लागल्या म्हणजेच त्याला माणुसकी म्हणता येते.

माणसाला बुद्धिपेक्षा मन अधिक जवळचे आहे. बुद्धिमान असणे सोपे आहे. परंतु बुद्धिवादी होणे खडतर असते. नवे मिळविणे जसे अगत्याचे आहे, त्यापेक्षाही आपणाजवळ काय आहे, याचा आपण कोठे आणि कसा उपयोग करू शकू, याची माणसास जाणीव असणे अगर करून देणे अधिक महत्वाचे आहे. महत्वाची गोष्ट आपल्याजवळ असते पण तिचे माणसास ज्ञान नसते. व तिचा पर्याय म्हणूत वाटणाऱ्या क्षुद्र वस्तु मिळवण्यासाठी हा कासावीस होत असतो. माणूस दुःखाचे स्वागत

करण्यास तयार नसल्यामुळे दुःखाची तीव्रता अधिक जाणवते. समोर वाढून येईल तेवढ्यापुरताच विचार केल्यास व भ्रामक कल्पकतेला वाव न दिल्यास कोणत्याही मोठ्या संकटाला सामोरे जातांना माणसाचा धीर खचत नाही. माणूस प्रतिकूल अशा वास्तविक परिस्थितीपेक्षा आपल्या अशा कल्पनेनेच अधिक भडक चित्र रंगवतो. त्यामुळे येणारे प्रत्येक संकट तो अधिक कडूपणाने भोगतो. जो मनुष्य या गोष्टी अभ्यासाने अंगी बाणण्याचा प्रयत्न करीत असतो, त्याला मानसिक थकवा येत नाही शिवाय कोणत्याही गोष्टीचा शीण वाटत नाही.

मनुष्य हा अनुकरण करणारा प्राणी आहे. मानवी बुद्धी ही तीव्र असल्यामुळे, मनुष्याची अनुकरणशक्तीही मोठी असते. प्रत्येक मनुष्याच्या बऱ्या-वाईट कृत्याचा परिणाम हा त्याचापुरताच रहात नसून, त्या परिणामाचे क्षेत्र पसरत जाते. आंब्याचे आढीत एक नासका आंबा असला, तर तो वेळेला सबंध आढी नासून टाकतो. सत्कृत्याचे किरण व तेज बालार्काप्रमाणे फाकत जाऊन चोहोकडे प्रकाश पाडतात व भरभराटीचे मार्गास नेतात.

" श्रद्धामयोऽ यं पुरुषः । "

"माणूस हा श्रद्धामयच आहे." असे गीतेमध्ये म्हटले आहे. श्रद्धा ही मानवी अंतःकरणाचा स्वाभाविक धर्म आहे. मानवी अंतःकरण ही एक अजब चीज आहे. कोंदणात हिरा बसवावा तथैव परमेश्वराने अघटित चातुर्याने मानवी शरीराच्या कोंदणात अंतःकरणरूपी अतिमनोहर असा हिरा बसविला आहे. या हिऱ्यावर दोषांचा कमीजास्त मळ बसल्यास तो वरचेवर झाडून टाकून त्याचे मनोहर स्वरूप कायम ठेवण्याचा सतत प्रयत्न करावयास पाहिजे. अंतःकरणात बीजरूपाने असणाऱ्या सद्गुणांपैकीच 'श्रद्धा' हा एक उत्कृष्ट गुण आहे.

पदार्थविज्ञानशास्त्रामध्ये, जेथे गुरुत्वाकर्षणाचा मध्य असतो, त्या ठिकाणी पदार्थ स्थिर रहातो. एक लाकडाची बाहुली कशीही टाकली तरी बैठी रहावी, अशा रीतीने गुरुत्वाकर्षण साधलेला असतो. त्याप्रमाणे आत्मसंयमनाच्या योगाने आपल्या अंतःकरणवृत्ती स्थिर ठेवण्याचा प्रयत्न नेहमी केला पाहिजे. गीतेमध्ये दुसऱ्या अध्यायात स्थिरबुद्धिचे महत्त्व सांगितले आहे, ते जरूर पहावे. प्रकृतीपासून उद्भविलेल्या दोषामुळे अंतःकरण हेलकावे खावयास लागले म्हणजे त्या अंतःकरणाची स्थिती तुफानात सापडलेल्या नौकेप्रमाणे होते. प्रसिद्ध तत्ववेत्ता बेकन म्हणतो – " Knowledge proceeds from wonder " ' आश्चर्यापासून ज्ञाननिष्पत्ती '



होते. कोणत्याही गोष्टीविषयी प्रथमतः आश्चर्य वाटले म्हणजे त्या गोष्टीचे ज्ञान मिळविण्याची मनुष्याच्या मनाची सहाजिकच प्रवृत्ती होते. ही जशी बुद्धीची गोष्ट आहे, तशीच अंतःकरणाचीही आहे. अंतःकरणसुद्धा आश्चर्यचकित झाले व त्याचेवर आश्चर्याचे संस्कार होत गेले म्हणजे ते विकास पावत जाते.

समाजामध्ये प्रत्येक मनुष्याचे निरनिराळ्या व्यक्तींशी संबंध उत्पन्न झाल्यामुळे त्यांच्याशी कोणत्या प्रकारची वागणूक असावी, याबद्दल विचार जरूर करावा. आपल्या सुखाबरोबर दुसऱ्याच्याही सुखाचा विचार करणे जरूर आहे. सर्वांचेच कल्याण होईल याबद्दल विचार करावयास पाहिजे. आई-बाप, बहिण-भाऊ, सोयरे-धायरे, इष्टमित्र, समाज व राष्ट्र यांच्याबद्दल कर्तव्याची ओळख करून घेऊन त्याप्रमाणे प्रत्येकाने वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मनुष्यप्राणी सहजासहजी जितका स्वतंत्र दिसतो, तितका तो खास नाही. वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय वगैरे कर्तव्यरज्जूंनी त्यास जखडून टाकलेले असते.

" क ईप्सितार्थ स्थिरनिश्चयं मनः ।<br>
पयश्च निम्नाभिमुखं प्रतीपयेत् ॥ " —कालिदास

" इष्टकार्य साधण्यासाठी निश्चित झालेले मन व खाली वहाणारा पाण्याचा ओघ कोण मागे फिरवील ? कर्तव्यनिष्ठा ज्याचे अंगात असते, त्या पुरुषाचे तन, मन, धन कर्तव्याकडे लागलेले असते. श्रेष्ठ पुरुषांची चरित्रे पाहिली असता त्यांची कर्तव्यनिष्ठा उत्कट होती, असे दिसून येईल.

" मनस्वी कार्यार्थी गणयति न दुःखम् नच सुखम् । "

" कार्य करण्यास तत्पर झालेला पुरूष आपल्या सुख-दुःखाची मुळीच पर्वा करीत नसतो. " कर्तव्यनिष्ठा वाढत गेली म्हणजे कार्याचे मार्गात फार अडचणी आल्या तरी त्यास तो दाद देत नाही.

जन्म व मरण ही दोन गूढे मनुष्याला आश्चर्य करून सोडणारी आहेत. जन्मामुळे भौतिक सुखवृद्धीची शक्यता तर मृत्यूने त्याला विरांम ! त्यामुळे मृत्यूचे भय अधिक वाटते. आपला आत्मा आपली सर्व कृत्ये पहात असतो याची जाणीव

आध्यात्मिक जीवनाखेरीज रोजच्या व्यवहारिक जीवनातदेखील जागृत ठेवणे जरूरी आहे. बऱ्याच भारतीयांचे यांबावतीत सदोदित: लक्ष्य असते. ते भाग्यवान, आहे असे समजावे.

समाजाचे धुरीण म्हणजेच समाजसुधारक काही मूलभूत तत्वज्ञान सांगतात. तत्वज्ञानाबरोबर आचारांचेही महत्त्व प्रतिपादले जाते. परंतु समाज हा विसराळू असतो आणि केवळ आळसामुळे, अज्ञानामुळे, स्वार्थामुळे, मोहामुळे या तत्वांचा गाभा नाहीसा होऊन फक्त सांगाडाच शिल्लक रहातो. व दुष्ट कृत्य करण्याची प्रवृत्ती बळावते. आदर्श समाजधुरीणांच्या मार्गदर्शनाने जाणे यासाठीच जरूरीचे असते.

# पाऊस !

*आर. के. पांढरे*

T. Y. B. Sc.

धो धो पावसात वादळ वारा
धुडगूस घालतो.
झाड न झाड फांदी न फांदी
बुसळून काढतो !
अशी कडाडते वीज
आभाळाच्या कुशित
नाजुक कळी जन्माला येते
पाना पानांच्या दाट फांदीत !






रुचकर व स्वादिष्ट भोजनासाठी आरामदायी निवासासाठी (फोन नं. २७८)
आपली आवड अेअर कंडीशन्स

" हॉटेल मोराको " जळगांव

स्वसंरक्षण व राष्ट्रीय चारीत्र्य संस्था, न्यू. दिल्ली, यांजकडून कॉंटिनेंटल ट्रेड फेअर अॅवॉर्ड पॅरेमाऊंट 'अ' वर्गाचे सन७३–७४ साली सुवर्ण पदक मिळालेली




खान्देश आयुर्वेदिक फार्मसी

तार–आयुर्वेद

फोन नं. २३

शास्त्रोक्त आयुर्वेदिक औषधी निर्माते व सरकारमान्य सप्लायर्स

ऑफीस व फॅक्टरी
११२ जिल्हा पेठ
जळगांव

## जळगांव तालुका कृषक सहकारी क्रय-विक्रय संघ लि. जळगांव

तार – कृषिजन

फोन– ऑफीस –२८३
जिनिंग प्रेस –९८८
मॅनेजर बंगला –३१७

आमचे संघा मार्फत शेतकऱ्यानां खालील प्रमाणें मालाचा पुरवठा केला जातो.

१) नत्रयुक्त खते
२) सिमेंट
३) लोखंड
४) पन्हाळी पत्रे
५) किटक नाशक औषधे

व शेतकऱ्यांचा माल अडतीवर विकून शेतकऱ्यांच्या मालास पुरेपूर किंमत मिळवून देतात.

तसेच सरकारच्या आदेशा नुसार वेळोवेळी निघणाऱ्या सरकारच्या स्किम राबविली जातात.

* आमच्या ग्राहकास नुतन वर्ष भरभराटीचे जावो हीच शुभेच्छा *

नारायण रामदास नेहेते
मॅनेजर

आनंदा खुशाल नारखेडे
मॅनेजिंग डायरेक्टर

नारायण गिरधर खडके
चेअरमन


# ये जिंदगी उसीकी है .... !


भागवत नाईक
T. Y. B. Sc.


रात्रीच्या शांततेला तोडीत कुठेतरी अकराचे टोल पडले, परत सर्व काही जसेच्या तसे शांत झाले. सगळीकडे भयाण शांतता पसरली आहे. सर्व गल्ली शांतपणे निद्रेच्या अधीन झालेली आहे. ही शांतता स्मशानतल्या शांततेप्रमाणे भासत आहे. माझ्या मनात एकच काहूर माजला आहे. डोकं अगदी सुन्न झालेलं आहे. खोलीत संपूर्ण अंधार आहे. कुठल्यातरी खिडकीतून प्रकाशाची तिरीप बाहेर आलेली आहे. अस्पष्टसा उजेड !.... तो सहन करण्याची देखील शक्ती माझ्या डोळ्यांत नाही. मला अंधार हवा आहे. खोली माझ्याभोवती गरगर फिरते आहे, खोलीच्या भिंती मला वाकूल्या दाखवीत आहेत. दारे, खिडक्या कुस्सीतपणे हसत आहेत. आकाशातील चंद्र आसूरी आनंदाने चमकत आहे. माझ्या मनात मात्र अंधार दाटला आहे. अमावस्येच्या काळ्याकुट्ट अंधाराहूनही भयाण अंधःकार. त्या अंधारात माझे मन गटांगळ्या खात आहे. भोवऱ्यात सापडलेल्या नावेप्रमाणे माझी स्थिती झालेली आहे. जिला बुडण्याव्यतिरिक्त दूसरा मार्गच नाही. माझे मन ओळीतल्या शद्वाप्रमाणे तिच्या विचारामागे धावते आहे. दूर दूर शून्यात कोठेतरी अंधारात काजवा चमकावा त्याप्रमाणे मला तिचा चेहरा दिसतो आहे. क्षणात बदलणारे भाव, मी न ओळखू शकणारे फसवे निळे डोळे, कटू हास्य हसणारे ओठ, कधीही न उमगणारे चेहऱ्यावरील प्रश्नचिन्ह हे सारं मला आता जाणवत आहे. या काळ्याकुट्ट अंधारातही ते स्पष्ट दिसत आहे. समोर टेबलावर मी नकार पाठविल्यावर माझी मनधरणी करण्यासाठी आलेली वडिलांची पत्रें; त्या सर्वांच्यावर मी आजच लिहिलेले, वडिलांना स्पष्ट नकार कळविलेले पण पोष्ट करावयाचे राहिलेले पत्र आणि त्यावर हिडीस हास्य करणारी तिची लग्नपत्रिका. माझ्या पराभवावर हसणारी. होय, माझा पराभव झालाय प्रेमात. मी हरलो आहे. आता अखेरपर्यंत प्रेमभंगाचे दुःख पचवून मला जगावं लागणार आहे. ती माझ्याशी खेळ खेळलीय. प्रेमाचा जुगार, शकुनी मामाच्या काव्याने ती जिंकली आहे. मी मात्र हरलोय. धर्मराज होऊन. अपयशी झाल्याचं दुःखही मी सहन करू शकणार नाही. आणि ती माझ्या समोरून उंच माथ्याने, माझी किंचितही पर्वा न करता माझ्या पराजयावर हसत, अपयशाची टोचणी लावत आपल्या जोडीदाराच्या हातात हात गुंफून या जगात वावरेल. या स्वार्थी जगात ..... हो ! या स्वार्थी जगात की जिथे

स्वार्थी लोक आहेत. प्रत्येक गोष्टीतून ते स्वतःचा स्वार्थ शोधीत असतात. आता तिला माझी गरज नाही. आता तिने नवीन जोडीदार शोधला आहे. माझ्याहून अधिक धनवान, कदाचित त्याच्याबरोबरदेखील ती तोच खेळ खेळत प्रेमाचा जीवघेणा खेळ. कदाचित अंधारात देखील तिचे डेळे याच विचारांनी चकाकत आहेत ...., हो, मला त्या डोळ्यातील लबाडी स्पष्ट दिसत आहे. एक क्षणभरच मला त्याची किंव येते ... बिचारा ! फसणार निळ्या डोळ्यांना ... माझ्याप्रमाणेच. पुढच्यास ठेच मागचा शहाणा ! हे अगदी खोट आहे. असं जर झालं असतं तर या जगात आता या घडीला एकदेखील मूर्ख शिल्लक राहिला नसता.

विचारांचा गोंधळ घालविण्यासाठी मी सिगरेट पेटविली आणि त्याचा दीर्घ धूर सोडीत त्या धावणाऱ्या धुराच्या रेषेकडे पहात बसलो. पण तिचे विचार माझ्या मनातून जायला तयार नाहीत. अगदी भूतासारखे ते माझ्या पाठी लागले आहेत. सिगरेटमुळे मनातली आग आणखी उफाळून येते. पण सवयीप्रमाणे मनात कुठेतरी बरे वाटते. भकासपणे मी सिगरेट पहातो व विषण्णपणे हसतो. ती जळते दुसऱ्या-साठी..... मी पण अंतरमनाने जळतो आहे दुसऱ्यासाठीच. उघड्या खिडकीतून वाऱ्याची शितल झुळूक आत आली. थंडगार वारा अंगाला झोंबला. वाऱ्याबरोबर डायरीची पानं उडू लागली. मी त्यांना थांबावयाचा प्रयत्न करीत नाही., त्याबरोबर माझ्या मनातील स्मृतिघडी उकलू लागते.....

माझी तिच्याशी.... स्नेहलशी लहानपणापासूनच ओळख होती. आम्ही एकाच शाळेत शिकलो. लहानपणी स्नेहलकडून माझं बरंच कौतुक झालं होतं. अभ्यासात हूशार व खेळात मी प्रवीण होतो. मला खूप गोष्टी येतात म्हणून ती माझं कौतुक करीत असे आणि तिच्याकडून माझं कौतुक झालं की मला आगळाच आनंद होत असे. एक गोष्ट खरी की माझ्या संगतीची तिला नेहमीच ओढ असायची. गोष्टी ऐकण्याच्या निमित्ताने किंवा गणित सोडविण्याच्या निमित्ताने ती बऱ्याचदा माझ्याकडे येत असे.

पुढे कॉलेजशिक्षणासाठी मला स्नेहलपासून दूर जावं लागलं. मी मुंबईत आलो– मुंबईत माझे मामा राहत होते. त्यांचेकडे माझी राहणेची सोय झाली. मामांना एक मुलगी होती – निलिमा – घाऱ्या डोळ्यांची निलीमा साऱ्यांशीच स्नेह दाखवी. सारेच जणू तिला आवडत. आणि कुणीच तिला विशेष प्रकारे आवडत नसे.



निलिमाच्या या पार्श्वभूमीवर मला स्नेहलची आठवण येत असे. स्नेहलला जणू मीच आवडत होतो. जणू तिचे डोळे माझ्याकक्षेभोवतीच फिरत. कॉलेजला उन्हाळ्याची सुटी पडली की मी गावी जात असे. मग माझे डोळे स्नेहलचाच शोध घेत असत. तिच्या सानिध्यात मी स्वतःला पूर्णपणे विसरून जात असे.

एके दिवशी मामांनी लग्नाचा विषय काढला. निलिमाविषयी त्यांना माझे मत हवे होते. आई–वडील मी निलिमाशी लग्न करावे या मताचे होते..... पण यावेळी मला स्नेहलची तीव्रतेने आठवण झाली. तिच्या प्रेमाशी प्रतारणा करणं मला जमलं नाही. मी मामांना नकार कळविला आणि त्याच दिवशी मला त्यांचे घरातून काढता पाय घ्यावा लागला. उरलेल्या वर्षासाठी मी खोली घेतली.

मधेच दोन दिवसाच्या सुटीत मी गावी आलो. टांग्यातून घरी जात असताना मला स्नेहल दिसली पण ती एकटी नव्हती. तिच्याबरोबर एक तरुण होता. हसत हसत ती जात होती. त्या तरुणाच्या हातात तिचा हात असल्याचा मला भास झाला. साणसाला किती मनें असतात देव जाणे ? माझ्या मनात निर-निराळ्या विचारांचा गोंधळ माजला. पण काही निर्णय घ्यावयाच्या आतच मी हाक मारली ' स्नेहल !....' तिने चमकून मागे पाहिले. मला पहाताक्षणी ती तीरासारखी माझ्या दिशेने धावली. घाईतच तिने मला विचारले, " केव्हा आलास ? आणि काही कळवायचे की नाही ? "

कशाला ? हे माझे उत्तर ओठातच राहले. आणि मी उतरलो. "हा काय आताच उतरलो आहे गाडीतून." थोडावेळ आमची बोलणी झाळी. स्नेहलने मला तिच्याबरोबर असलेल्या तरुणाची ओळख करून दिली. तो तिचा मित्र होता; नाव विजय प्रधान. माझ्यांशी हस्तांदोलन करताना त्याचा हात निखळून पडला होता. त्याचा चेहरा स्थिर होता. ओठ निःशद्ब होते. त्याची वागणूक मोकळेपणाची नव्हती. तो घाईघाईतच स्नेहलला म्हणाला, "स्नेहा निघतो मी ?" त्याने आमचा निरोप घेतला. काही क्षण स्तब्धतेत गेले. आम्ही दोघही गप्प होतो. पण शेवटी मीच विचारले, "स्नेहा, विजय प्रधानशी तुझी ओळख केव्हा व कशी झाली ? " "दोन महिन्या-पूर्वी." ती म्हणाली. "आणि ओळखीबद्दल विचारशील तर तो योगायोगानेच भेटला असेच म्हणावयास पाहिजे, त्या दिवशी मी रस्त्यात सायकलवरून पडले; तेव्हा त्याने मला त्याच्या गाडीतून घरी पोचवलं" मी यावर गप्प बसलो. मनात वेगवेगळे विचार येत होते. न राहवून तिला म्हणालो, ' स्नेही, तुला एक विचारू ? तू हक्काने विचारू

शकतोस ! ''या शब्दांनी मला अबोल केलं – माझं समाधान झालं मी पुढे तिला का विचारले नाही. ....

एकदम माझ्या बोटांना चटका बसला. मघाशी पेटविलेली सिगरेट टोकापर्यंत जळत आली होती. मी भानावर आलो. स्मृतीची शृंखला तुटली होती. पुन्हा मी वास्तवतेत आलो. माझ्या डायरीत मी तिच्या प्रेमाच्या स्मृती टिपून ठेवल्या होत्या. डायरीच्या अखेरच्या पांनावर तिची अखेरची आठवण होती– विजय प्रधान आणि ती एकत्र फिरत असताना मी भेटलो होतो. योगायोगाने तीच आमची शेवटची भेट ठरली होती. अचानक माझ्या लक्षात आले – आजची तारीख ३१ डिसेंबर आहे. किती विचित्र योगायोग आहे. आज महिन्याचा आणि वर्षाचा शेवटचा दिवस आहे. सुरुवातीला डायरीत नमूद केलेली तिची शेवटची आठवण शेवटच्याच पानावर आहे. मुळात जळणारी आहे ती माझ्या मनातील दुःखाची. जन्मभर ज्या पश्चातापाच्या आगीत मी जळणार आहे. त्या जिवंत ज्वाळांनी तिच्या सोबतीत लविलेल्या विविध स्मृतींच्या आठवणीने मी आता घायाळ होत जाईन. आता सुरुवात आहे, त्या भविष्याची – ज्याबद्दल मी कधीच विचार केला नव्हता. ज्याची शंकादेखील माझ्या मनाला स्पर्शिली नव्हती. ज्या भविष्यकाळाची मी कधीही पर्वा केली नव्हती. आता त्या भविष्याच्या कल्पनेनेदेखील माझ्या अंगावर शहारे आलेले आहेत. भूतकाळातील स्मृतींनी भावी भविष्य काळात मी दुःखी होणार आहे. माझ्यासमोर मोठे प्रश्नचिन्ह आहे. आयुष्यभर असेच पश्चातापाने जिणे जगावे की..... आत्मघात ! छे..... मी इतका भ्याड नाही. जीवनातील पराजयामुळे खचून जाऊन आत्मघाताचा विचार करणाऱ्याप्रमाणे मी कमकुवत नाही. दोन मनांच्या विचारशृंखलेत मी अडकलो आहे. भारताच्या मानचिन्हाखालील ओळ मला आठविली 'तमसो मा ज्योतिर्गमय' हे प्रभो मला जीवनातील प्रकाशाचा मार्ग दाखव,

धाडकन् वरून काहीतरी पडले. टेबलावरील टेबललॅम्प प्रकाशित झाला. एकदम गप्पकन् डोळे मिटले. अंधारात चाचपडणाऱ्या मला उजेड सहन झाला नाही. एक मांजर खिडकीतून बाहेर पडत होते. फळीवरून पडलेले पुस्तक नेमके टेबललॅम्पच्या बटणावरच पडले होते. पुन्हा एकदा शांततेचा भंग करीत कुठेतरी बाराचे टोल पडायला लागले एक, दोन, तीन ..... आता काही सेकंदातच नवीन वर्ष लागणार आहे. नवे वर्ष, नवा दिवस ... नवे विचार ! लख्खकन् ट्युबलाईट चमकावा त्याप्रमाणे माझ्या मनात विचार चमकून गेला. नवे विचार ? हो, मी माझे विचार बदलायला पाहिजे. माझ्या जीवनाबदलच्या कल्पना मी बदलायला पाहिजे. आयुष्यातील घडामोडींशी हात मिळवणी करायला, शिकायला पाहिजे. सुख – दुःख, जय – पराजय हे तर सर्वांनाच



लागू आहेत. लांबून कुठूनतरी अस्पष्ट आवाजात सतारीची धून ऐकायला येत होती– ये जिंदगी उसीकी है .... जो इसीका होगया .... बाहेरून आता नववर्षाच्या स्वागताचा जल्लोष ऐकायला येत होता. माझं लक्ष गेलं. तिची पत्रिका वाऱ्याने उडाली होती. सरळ टेबललॅम्पच्या मागं गेली होती. परत अंधारात उठून पेन व लेटरपॅड घेतला आणि लिहू लागलो. सुटी लागताच मी गावी जाणार होतो. वडिलांना मी होकार कळविला होता. आयुष्यातील जोडीदारीण माझी जीवनसंगिनी शोधायला जाणार होतो. जी मला धोका देणार नाही. मी भुलविणारं सौंदर्य, फसवे निळे डोळे टाळणार होतो. निळे डोळे ! नको .... मला तिची आठवणसुध्दा नको. टेबललॅम्पच्या मागच्या अंधारात आता तिचा चेहरा अगदी अस्पष्ट झाला आहे. दूर दूर जातो आहे. तिचे निळे डोळेपण. आता ते भुरकट पडलेले दिसत आहेत. तरीसुद्धा त्यातून लबाडी डोकावत आहे. पण मला त्याची फिकीर नाही. बाहेरचा आवाज आता वाढला आहे. आकाशातील चंद्र आता मंद मंद स्मित करीत आहे. आता मी हसतो आहे. खोलीच्या दारे–खिडक्या मला साथ देत आहेत. तिचा चेहरा आता पूर्णपणे अदृष्य झालेला आहे. सतारीची धून आता स्पष्ट झाली आहे.....

ये जिंदगी उसीकी है ..... जो इसीका हो गया ..... !

सर्व प्रकारच्या उत्कृष्ट छायाचित्रांसाठी
एकवेळ अवश्य भेट द्या
—: डिलक्स फोटो स्टुडिओ :—
जुन्या एस्. टी. स्टॅन्डसमोर, नवी पेठ, जळगांव
प्रो. जे. एन्. पाटील

# धरा

कु. नीना सोनूनीस

S. Y. B. A.

निळयानभांगणा खाली
धरा सारी दग्ध झाली
कोण जाणे कुणावर
धरा ! रुसली रुसली !

हसविण्या धरतीला
आला स्वर्गीचा वरूण
केले तृप्त धरतीला
आलिंगून कणकण !

वरूणाच्या वर्षावाने
धरा हासली, लाजली
मान विसरून वेडी
मोहरली ! मोहरली !

चिंब झाले रान रान
कळी कळी उमलली
जाणवून नवे रूप
धरा लाजली ! लाजली !



# बदला

सौ. कुंदबाला खांडेकर

Sr. M. A.

" सिस्टर, किती वेळाने ऑपरेशन संपेल " ?
एक आर्त आणि आततायी प्रश्न.
" At least one hour more "
पांढऱ्या स्वच्छ आवरणातून आलेला एक यांत्रिक आवाज.
प्रशांत खिन्न झाला.
संदीप ऑपरेशन टेबलावर;
प्रशांत आणि सरिताच्या जीवनावरचे भाग्यफूल म्हणजे संदीप.
हॉस्पिटलची भयाण शांतता.
प्रशांतच्या दोन हातात गच्च दाबले जाणारे कपाळ.
शेजारी अस्वस्थपणे होणारी साडीची सळसळ.
निराशेत भर घालणारी घड्याळाची टक टक.
असहाय्यता आणि निराशेचे दोघेही सम्राट– ती आणि तो !

× × ×

गावात दिव्यांच्या डोळ्यांचा चमचमाट.
संदीपची बालीश गडबड.
त्याचे बालीश हट्ट पुरविण्यात चाललेली दोघांची धडपड.
चिमुकल्या दिव्यांचे तोरण दारावर.
आनंदाचे संदीपच्या चेहेऱ्यावर उधाण.
प्रशांत, सरिता तृप्त, आणि वात्सल्यानंदात मस्त !
फाड्, फाड्, फाड्
संदीपच्या चिमुकल्या हाताकडून दिवाळीचे स्वागत.
इतक्यात ते बालीश हात दृष्टावले !
काळोखच काळोख !
" आई, बाबा " आर्ततेच्या किंकाळ्यांनी अंधार भेदून गेला.
' आई " सरिताला नर्सने हलविले.

संदीपचे ऑपरेशन अडले
रक्तपुरवठ्याचा अभाव.
प्रशांत, सरिता हतबुद्ध !
दैवाने बांधलेली – नाती पण शास्त्राने तोडली.
रक्तांचे ग्रुप भिन्न मार्गांनी जात होते.
असहाय्य, विकलांग प्रश्न– विनाकारण उफाळलेला–
" ऑपरेशन कोण करतंय् ! "
" डॉ. सागर, परांजपे आय स्पेशॅलिस्ट "

× × ×

सागर परांजपे– आणखी एक घाव.
दोन तुकडे एकत्र आले.
कॉलेजचे विश्व –
प्रशांत सागर व सागर प्रशांत . . .
एकसंध जुळलेले
सागरला लक्ष्मीचा वडिलोपार्जित वरदहस्त.
प्रशांत शाळामास्तरकीच्या सरस्वती वंशातला.
श्रीमंतीने गरीबाला लाथाडले.
लग्न मांडवात होणारे थंडे स्वागत–
प्रशांतचे मन चरचरून गेले
केवळ संशय शंकाचे व्दंव्द !
मैत्रीचा संशय ?
संथ जलाशयाप्रमाणे असणारा सागर
त्याच्या पोटातून सूडाचा ज्वालामुखी भडकला.
सागर प्रशांत दुरावले
पण सागरच्या मनात दूर कोठेतरी–
ज्वालामुखी धुमसत पडून होता.

× × ×

ऑपरेशनथिएटरच्या पारदर्शक काचेतून
सागरचे डोळे पहात होते–
प्रशांत आणि सरिता
समोर टेबलावर होता
त्यांचा एकमेव आधार.



त्याच्या रक्ताला आधार द्यावयाला
सागर समर्थ होता
ही दैवगती की सूडाची संधी ?
सागरच्या अंतःकरणात द्वंद्व प्रगटले–
सूड की जीवदान ?
केवळ संशयात्म्याला अद्दल घडवायची ?
अजाण बालकाला कठोर शिक्षा का ?
सरीताच्या डोळ्यातून सरसरणारे अश्रू ?
ते थोपवयाचे का ?

× × ×

अजाणपणाचा मातृत्वाचा आणि
डॉक्टरी कर्तव्याचा विजय–
यमराजाची हार–
संदीपला जीवदान मिळाले.
पण–
संदीपच्या डोळ्यासमोर जन्माचा काळोख पसरला ?
सागर सरिता प्रशांत सगळे त्या
काळोखात चाचपडू लागले.
सागरने घेतलेला बदला ? की दैवगती ?
दैव खदखदा हसले–
सागर होरपळला
आणि संदीप– त्याची दृष्टी हरवली–
कायमची !

# चित्र

कु. स्मिता होळे

S. Y. B. A.

अंधाऱ्या रात्री
अज्ञात अंधाऱ्या वाटी
मला खदाखदा हसवलं
आणि स्वत: ही हसला
अकाळविकाळ – काळोख

मी त्याच्या डोळ्याकडे पाहिले
पण डोळेच नव्हते
मी त्याच्या चेहऱ्याकडे पाहिले
पण चेहराच नव्हता–
मी त्याच्या पायाकडे–
माझीच पावलं उलटी होती.

× × ×

तुकाराम श्रीपत चौधरी

पोलन पेठ, जळगाव.

आमचेकडे सर्व प्रकारचे लोखंडी सामान व शेतकी उपकरणे मिळतील.
सिमेंट स्टॉकीस्ट– सी. सी. आय.
भारत टाईल्स– घराची शोभा वाढविणारे रंगी बेरंगी.
—० सेल्स डेपोस भेट देऊन खात्री करावी •—



# कोमजलेले फूल

कु. कमल पी. येवले

T. Y. B. A.

उन्हाळयाचे दिवस होते, १२ वाजेची वेळ होती, बाहेर रखरखीत उन पडलं होतं. निलिमा नुकतीच घरातील सर्व कामें आटोपून बिछान्यावर कलंडली. पण डोक्यात विचारचक्र सारखे गरगर फिरत होते. आज ती कोर्टात जाऊन घटस्फोटाची नोटीस देणार होती. अरविंदराव तिचे पती. रहायला भव्य बंगला होता. पण बंगल्याच्या चार भिंतीपलिकडे काय चाललं आहे हे तिला माहित नव्हतं. डोक्यात विचार चालू असताना दारावरची बेल तिला ऐकू आली. तिच्या छातीत धस्स झाले. तिला वाटले अरविंदच आला असावा दारू पिऊन. दार उघडून पोस्टमनच्या हातातील तार दिसताच ती आणखीच घाबरली. तार कापऱ्या हातांनी घेतली 'आबा आजारी आहेत. लवकर ये' तिच्या डोळ्यापुढे असंख्य काजवे चमकू लागले. तिने घाई-घाईने आपले सापडतील तेवढे कपडे बॅगमध्ये भरले. नोकराला सांगून घराबाहेर पडली. रस्त्यातच थोडं थांबून कोर्टात तिने घटस्फोटाची नोटीस दिली. आता मिळेल त्या गाडीने अमरावतीला जाणं तिला भाग होतं. तिच्या सुदैवाने गाडीही तिला वेळेवर मिळाली. गाडीतही तिचे मन ठिकाणावर नव्हते. स्टेशन येताच गाडी थांबली. निलिमा घाईने हातात बॅग घेऊन, साडी सावरीत गाडीतून खाली उतरली व भराभर चालू लागली. टॅक्सीच्या दिशेने ! तोच तिला निम्मू ऽऽ निमू ऽऽ अशा दोन-तीन हाका ऐकू आल्या. तिने मागे वळून पाहिलं. सुधाकर ! हो सुधाकरच होता तो !

एकेकाळचा तिचा सुधाकर होता तो ! तिने तिच्या लाडक्या सुधाकरला ओळखले देखील नाही. त्याची प्रकृती फारच खराब झाली होती, घाणेरडे कपडे, पिंजलेले केस, वाढलेली दाढी पाहून तिला त्याचेकडे बघवेना. तिला भडभडून आलं. तीन वर्षांत त्याचे काय झाले याचा पत्ता नव्हता तिला ! तिला वाटायचे सुधाकरने लग्न केलं असेल, छोटासा संसार थाटला असेल, कदाचित एखादं मूलही झालं असेल. आणि आपल्याला तो विसरलाही असेल. पण आजपर्यन्त केवळ आपल्यासाठी सुधाकरने लग्न केले नाही हे तिला नंतर समजल्यावर ती स्वत:लाच दोष देऊ लागली.

त्या दोघांनी टॅक्सी केली. टॅक्सीच्या चाकाबरोबर तिचे विचारचक्रही वेगाने

धावत होते. पण टॅक्सी मात्र पुढे धावत होती. तिचे विचारचक्र गतकालात [illegible] लागले...... सकाळचे सात झाले होते. अशा सकाळच्या रम्य वातावरणात [illegible] मन नेहमी उल्हसित होत असते. तिला पूर्वी सुधाकरबरोबर असताना असेच वाटे.

पण तिच्या लग्नापासून तीनवर्षात तिला तो अनुभव घेता आला नाही [illegible] तिला अरविंदाबरोबर घ्यावासाही वाटला नाही.

लहानपणी निलिमा आबांची आवडती मुलगी. तिने खूप अभ्यास करा[illegible] खूप शिकावं असं त्यांना वाटे. ते निलिमाला सकाळी अभ्यासाला उठवीत. [illegible] निलिमाला तिची साखरझोप मोडल्यामुळे आबांचा खूप राग यायचा. तिला नेह[illegible] वाटायचे ' ह्या म्हाताऱ्यांना लहान नि तरूणांच्या झोपेचाच काय, प्रत्येक गोष्टीचा हे[illegible] वाटतो, पण बोलणार कसे ! वडिल माणसं आपल्या भल्यासाठीच रागवतात- तरीही त्यांचे चुकते असे तिला नेहमी वाटे. ते दोन पिढीतील अंतर ओळखतच नाही[illegible] ते आपले विचार मुलांवर लादू पाहतात. तरुणांच्या आशा–आकांक्षा चुरगळू[illegible] टाकतात. त्यांच्या मनातील सुप्तशक्तीचा विचारच करीत नाहीत. मराठी शाळे[illegible] असताना गुरुजीच्या म्हणण्यावरून आई–वडिल हे परमेश्वरासमान आहेत, असे [illegible] माने. पण आज तिला पूर्ण कळून चुकले होते. तिच्या वडिलांनी तिला त्यांच्या इच्छेचे गुलाम बनविले होते. त्यांनी निलू–सुधाकरसारख्या उमलू पाहणाऱ्या कळ्या हातांनी चुरगळून टाकल्या होत्या.

